कृषीवल

किंमत ४ ₹

रायगड ।। शनिवार, दिनांक ३ डिसेंबर २०२२

रेतीमाफियांना दणका

➤आठ बार्ज, दोन छोट्या सक्शन बोटी जप्त ➤एनआरआय पोलिसांची कारवाई

। पनवेल । विशेष प्रतिनिधी ।

तळोजा खारघर खाडीमध्ये सक्शन पंपाच्या माध्यमातून बेकायदेशीररित्या रेतीउपसा करणाऱ्या वाळूमाफियांविरोधात प्रशासनाने कारवाईचा बडगा उचलला आहे. गुरुवारी (ता.१) सायंकाळी करण्यात आलेल्या या कारवाईत चार मोठे आणि चार मध्यम बार्ज व दोन छोट्या सक्शन पंपच्या बोटी अशा दहा बोटींवरती धडक कारवाई करण्यात आली असून, कोट्यवधींचा माल जप्त करण्यात आला आहे. संबंधिताविरुद्ध एनआरआय पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशान्वये अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव यांच्या नेतृत्वाखाली पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यांनी ही कारवाई केली आहे. त्यामुळे अवैध वाळू काढणाऱ्या माफियांचे धाबे दणाणले आहेत.

पनवेल तालुक्यातील खाडी परिसरात अनधिकृतपणे वाळूउपसा करून निसर्गाला हानी पोहोचविण्याचे काम वाळूमाफियांकडून सुरू होते. जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांच्या निर्देशानुसार अप्पर जिल्हाधिकारी अमोल यादव व त तहसीलदार विजय तळेकर यांच्या पथकाने अचानक वाळूमाफियांच्या खाडी भागातील अनधिकृत बोटींवर धाड टाकून कारवाई केली. या धाडीत चार मोठ्या बार्ज आणि चार मध्यम बार्ज व दोन छोट्या सक्शन पंपच्या बोटी अशा दहा बोटींवरती धडक कारवाई करण्यात आलेली आहे.

खारघर पोलीस ठाणे यांच्या ताब्यात सहा बार्ज देण्यात आलेल्या आहेत व संबंधितांवरती ४१ डी अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. दोन बोटी एनआरआय पोलिसांच्या ताब्यात देण्यात आलेल्या आहेत व संबंधितांविरुद्ध एनआरआय पोलीस •➤ पान २ वर

राज्यातील मंत्र्यांना कर्नाटकात मज्जाव

। मुंबई । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र आणि कर्नाटकम सीमावादामुळे राजकारण तापलेले असतानाच आता महाराष्ट्रातील मंत्र्यांना बेळगावमध्ये पाऊल ठेवण्यास मज्जाव करण्यात आला आहे. याबाबत कर्नाटक सरकारने एक फतवाच काढला आहे.

महाराष्ट्रातील मंत्र्यांनी कर्नाटकात येऊ नये, असे पत्र कर्नाटक सरकारने महाराष्ट्र सरकारला पाठवले आहे. कर्नाटक सरकारच्या मुख्य सचिवांनी महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना हे पत्र पाठवले आहे. कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे मंत्र्यांनी कर्नाटकात येऊ नये, असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

गोठा जळून खाक

आठ गुरे गंभीर, शेतकऱ्याचे मोठे नुकसान

। खांब-रोहा । वार्ताहर ।

शॉर्ट सर्किटमुळे गुरांच्या गोठ्याला आग लागण्याची दुर्दैवी घटना रोहा तालुक्यातील खांब या गावी या घडली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार खांब येथील रहिवासी असलेले व नुकतेच वन विभागातून सेवानिवृत्त झालेले वनाधिकारी शंकर धनावडे यांनी आपल्या राहत्या जागेत तीन-चार वर्षांपूर्वी भाजीपाल्याची शेती, पशुपालन व घरगुती खाणावळ आदी व्यवसायास प्रारंभ केला. त्यांचे चिरंजीव यांनी पशुपालनातून दुग्धव्यवसाय करून आपल्या व्यवसायात स्थिरावला असतानाच दि.१ डिसेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास गुरांच्या गोठ्यास शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागली. या घटनेत गुरांचा गोठा तर जळून खाक झाला असून, गोठ्यातील आठही गुरे मोठ्या प्रमाणावर भाजली आहेत. यापैकी चार गायी या दुभत्या आहेत. आगीचे वृत्त समजताच अनेक तरूण व ज्येष्ठ नागरिक यांनी घटनास्थळी धाव घेऊन व प्रसंगावधान राखून स्वत:च्या जीवाची पर्वा न करता गुरांना गोठ्यातून काढण्यात यश मिळविले. या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त होताना दिसत आहे. तर, शासकीय स्तरावर या घटनेची दखल घेऊन तात्काळ पंचनाम करावा व शेतकऱ्यास नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे.

बिबट्याची दहशत

तीन दिवसांत कुत्रे, बकरी व रेडके फस्त

मनुष्यहानीच्या शक्यतेने भीतीचे वातावरण

। रेवदंडा/कोर्लई । प्रतिनिधी ।

फणसाड अभयारण्यातील बिबट्याचा वावर गेल्या दहा-पंधरा दिवसांपासून जंगलभाग सोडून मनुष्यवस्तीत होत असल्याने साळाव पंचक्रोशीत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या बिबट्याने आतापर्यंत गेले दोन-तीन दिवसांत कुत्रे, बकरी व रेडके फस्त केले आहेत. तसेच पहाटेच्या सुमारास मुख्य रस्त्यावर बिबट्याचा वावर दिसून आला आहे. त्यामुळे मनुष्यहानीची शक्यता नाकारता •➤ पान २ वर

साळाव येथे म्हशीच्या दोन रेडकांचा जंगली हिंस्त्र प्राण्यांच्या हल्ल्यामुळे मृत्यू झाला आहे. प्रथमदर्शनी मृत जनावराची पाहणी केली असता मानेवर व पायाकडील भागावर जखमा आढळून आल्या.
– डॉ. सुदर्शन पाडावे पशुधन विकास अधिकारी (मुरुड)

माझ्या गोठ्यात बांधलेल्या म्हशीच्या दोन रेडकांचा मृत्यू झाल्याने मोठे नुकसान झाले आहे. या घटनेचा रितसर पंचनामा करण्यात येऊन मला योग्य ती नुकसान भरपाई मिळावी.
– कृष्णा रामा पाटील, ग्रामस्थ, साळाव

आता घरबसल्या मिळणार सुविधा

जिल्हा परिषदेची ऑनलाईन प्रणाली सुरू

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

रायगड जिल्हा परिषद प्रशासना'च्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने नागरिकांना घरबसल्या कशा सुविधा पुरविता येतील याकडे विशेष लक्ष दिले जात आहे. यासाठी जिल्हा परिषदेने विविध ऑनलाईन सुविधा सुरू केल्या असून, त्यासोबतच नागरिकांना एखादी योजना राबविताना किंवा एखादी समस्या दिसल्यास ती मांडण्यासाठी आपल्या नावीन्यपूर्ण संकल्पना सुचविण्याची सोयही उपलब्ध करून देण्यात आली आहे. या सर्व ऑनलाईन प्रणाली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या संकल्पनेतून तयार करण्यात आल्या आहेत.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त रायगड जिल्हा परिषदेचे कामकाज गतिमान होण्यासाठी तसेच नागरिकांना घरबसल्या सुविधा पुरविण्यासाठी विविध ऑनलाईन प्रणाली कार्यान्वित करण्यात येत आहेत. जिल्हा परिषदेच्या माध्यमातून ऑनलाईन घरपट्टी भरणा प्रणाली, अमृतग्रम डिजिटल कर प्रणाली, कंत्राटदार ई-नोंदणी, ई-कामवाटप नोंदणी प्रणाली, अमृतग्राम कार्यक्रम नोंदणी प्रणाली, अमृत नावीन्यपूर्ण संकल्पना प्रणाली, निवृत्तीवेतन धारकांसाठी अमृत प्रणाली अशा विविध ऑनलाईन सेवा सुरू करण्यात आल्या आहेत.

या ऑनलाईन प्रणालींमुळे कामकाजात सुसूत्रता येण्यासोबत कामकाज गतिमान झाले आहे. याचबरोबर •➤ पान २ वर

ऑनलाईन प्रणालीमुळे प्रशासकीय कामकाज गतिमान होणार आहे. नागरिकांना अनेक सुविधांचा लाभ ऑनलाईन घेणे सोयीचे ठरणार आहे, यामुळे त्यांच्या वेळेची बचत होईल. यामुळे ग्रामपंचायतींची कर वसुली वाढण्यास मदत होईल. तसेच नागरिकांना त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पना प्रशासनाकडे मांडण्याची ऑनलाईन सोयही उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यातील नागरिकांनी या सर्व सेवांचा लाभ घ्यावा.
– डॉ. किरण पाटील
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रायगड



अभीष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३ डिसेंबर

१) श्री.सीताबाई राउत
मु.ब्राम्हणआळी, अलिबाग
३-१२-१९४४

२)श्रीम.उदय पाटील
विद्यानगर, अलिबाग
३-१२-१९४७

३)श्रीम.अंजली कवळे
मु.वेश्री, अलिबाग
३-१२-१९५४

महत्त्वाचे

उरण येथे आज महामेळावा

चिरनेर : रायगड जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली व उरण तहसीलदार यांच्या वतीने राज्य व केंद्र शासनाच्या विविध योजनांचा महामेळावा शनिवार (दि. ३) रोजी सकाळी १० वाजता वासुदेव बळवंत फडके, सभागृह उरण चारफाटा येथे आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात शासनाच्या सर्व सेवांची माहिती देण्यात येणार आहे. तसेच सेवांचे वाटप करण्यात येणार आहे.संजय गांधी निराधार ब अनुदान योजना, श्रावण बाळ राज्य सेवा निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा अनुदान योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ अनुदान योजना, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना, अंत्योदय योजना, अन्न सुरक्षा योजना, पीएम किसान योजना आदी योजनांची माहिती दिली जाणार आहे. तरी उरण परिसरातील सर्व नागरिकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन उरण तहसीलदार भाऊसाहेब अंधारे यांनी केले आहे.

सुपारी संघाची निवडणूक लांबणीवर

निवडणूक प्रक्रिया थांबल्याने इच्छुकांमध्ये नाराजी

। आगरदांडा। प्रतिनिधी।

तीन कोटींची वार्षिक उलाढाल असणारा मुरुड तालुक्यातील नामंकित मुरुड तालुका सुपारी खरेदी-विक्री संघाची निवडणूक लांबणीवर गेल्याने उत्सुक उमेदवारांचा हिरमोड झाला आहे. आज १ डिसेंबर रोजी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता. त्यामुळे कोण उमेदवार आपला अर्ज मागे घेणार याची मोठी उत्सुकता होती. निवडणुकीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असताना शासनाने नवीन अध्यदेशाद्वारे अ व ब वर्गातील संस्थांच्या निवडणूक पुढे ढकल्याण्याचा निर्णय घेतला आहे. सदरील निवडणुकांना २० डिसेबरपर्यंत स्थगिती देण्यात आल्याची माहिती सहकारी संस्थांचे ए.आर. प्रशांत पाटील यांनी पत्रकारांना दिली आहे. त्यामुळे निवडणुकीची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली असतानादेखील शासनाच्या स्थगिती आदेशामुळे या

निवडणूक पुढे ढकलण्यात आल्या आहेत.

संपन्न होणाऱ्या या निवडणुकीत सुपारी खरेदी विक्री संघाचे १३०६ सभासद असून, ते आपल्या मतदानाचा अधिकार बजावणार होते. सहकारी तत्वावर स्थापन झालेला हा सुपारी संघामुळे स्थानिक लोकांनासुद्धा मोठा रोजगार प्राप्त झाला आहे. मुरुड तालुक्यातील सुपारीचे पीक घेणाऱ्या बागायतदारांना चांगला भाव मिळवून देण्याचे काम सुपारी संघातर्फे होत असते. दर पाच वर्षांनी या संघाची सार्वत्रिक निवडणूक होत असते. १७ संचालक विविध भागातून निवडून दिले जात असतात. निवडून आलेल्यामधून चेरमनपदाची निवड होत असते.

या सुपारी संघाची निवडणूक १० डिसेंबर रोजी संपन्न होणार होती. आतापर्यंत या निवडणुकीसाठी ४० जणांचे अर्ज सहाय्यक निंबंधक श्रीकांत पाटील यांच्याकडे जमा झाले होते. या अर्जांची छाननी प्रक्रिया संपन्नसुद्धा झाली होती. ४० अर्ज वैध ठरले होते.

या निवडणुकीत उत्सुक उमेदवार आपापले स्वतंत्र पॅनल काढून ही निवडणूक लढवत असतात. या निवडणुकीत ज्यांची बागायत जमीन आहे त्यांनाच मतदान हक्क असतो. दोन्ही पॅनलकडून अर्ज दाखल करण्यात आले असून, सर्वांनी निवडणुकीची जोरदार तयारी सुरु केली होती. सुपारी संघावर संचालक म्हणून जाण्यास प्रत्येक जण उत्सुक होता.परंतु, आता निवडणूक पुढे ढकल्यामुळे सर्वांची नाराजी झाली आहे.

शेवटच्या दिवशी मोठी गर्दी

सरपंचपदासाठी ३५ तर सदस्यांसाठी १५८ अर्ज

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

ग्रामपंचायतीच्या निवडणुकांच्या अर्ज भरण्याचा शुक्रवारी शेवटचा दिवस होता. सर्व्हर डाऊनमुळे ऑफलाईन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात झाल्याने आज अलिबाग तालुक्यातील सहा ग्रामपंचायतींसाठी उमेदवारांनी अर्ज भरण्यास मोठी गर्दी केली होती. सहा सरपंचपदांसाठी आजच्या दिवशी १६, तर आतार्यंत एकूण ३५ अर्ज दाखल झाले आहेत. त्याचप्रमाणे ४६ सदस्यपदांच्या जागांसाठी आज ८४ अर्ज दाखल झाले. आतापर्यंत तब्बल १५८ अर्ज सादर करण्यात आले आहेत.

तालुक्यातील नारंगी ग्रामपंचायतीत थेट सरपंचपदासाठी आज दोन अर्ज सादर झाले असून, आतापर्यंत एकूण सात अर्ज दाखल झाले आहेत. तर, सदस्यपदासाठी आज आठ आणि एकूण २३ अर्ज दाखल झाले आहेत. शिरवलीमध्ये

सरपंचपदासाठी आज आठ, तर एकूण १०, तर सदस्यपदासाठी आज २५ तर एकूण ३४ अर्ज दाखल झालेत. वैजाली ग्रामपंचायतीत आज थेट सरपंचपदासाठी दोन, तर आतापर्यंत सहा अर्ज सादर झाले आहेत. सदस्यांसाठी आज १९ तर आतापर्यंत ३३ अर्ज सादर झाले आहेत. बोरीस गुंजीस ग्रामपंचायतीमध्ये आज थेट सरपंचपदासाठी एक, तर एकूण चार अर्ज रिंगणात आहेत. तसेच सदस्यपदांसाठी आज सात अर्ज सादर झाले असून, एकूण अर्जांची संख्या २२ झाली आहे. त्याचप्रमाणे आक्षी ग्रामपंचायतीच्या थेट सरपंचपदासाठी आज दोन, तर एकूण चार अर्ज दाखल करण्यात आले आहेत. तसेच सदस्यपदांसाठी आज १७ आणि एकूण २८ अर्ज सादर करण्यात आले आहेत. मुळे ग्रामपंचायतीमध्ये थेट सरपंचपदासाठी आज एक, तर आतापर्यंत चार आणि सदस्यपदांसाठी आज ८ तर एकूण १८ अर्ज सादर करण्यात आले आहेत. ५ डिसेंबर रोजी नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात येणार असून, त्यानंतर ७ डिसेंबर रोजी अर्ज माघारी घेण्याची अंतिम मुदत आहे. त्याचप्रमाणे १८ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. तर, २० डिसेंबर रोजी मतमोजणी करण्यात येणार आहे.

अलिबागमध्ये दिव्यांगांसाठी कार्यशाळा

। अलिबाग विशेष प्रतिनिधी

जागतिक दिव्यांग सप्ताहाचे औचित्य साधून महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटना या शासनमान्य नोंदणीकृत संघटनेच्या वतीने तीन दिवसांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य अपंग कर्मचारी संघटनेचे राज्याचे अध्यक्ष साईनाथ पवार यांनी तुषार शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी त्यांच्यासमवेत संघटनेचे कोषाध्यक्ष विलास भोतमांगे, राज्य सचिव ललित सोनवणे, रायगड जिल्हा सचिव संतोष माने, अलिबाग तालुका अध्यक्ष अप्पा काळेल,पेण

तालुका सचिव राजेंद्र पाटील आदी पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यशाळेच्या उद्घाटनाचा कार्यक्रम सोमवार, ५ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालय, निलीमा हॉटेलच्यामागे अलिबाग येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होणार आहे. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ग्राम विकासमंत्री गिरीश महाजन, बंधारे आणि खनिकर्ममंत्री दादासाहेब भुसे, आ. बच्चू कडू हे उपस्थित राहाणार आहेत. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून खा. सुनिल तटकरे, मावळचे खा. श्रीरंग बारणे, आ. जयंत पाटील, आ. अदिती तटकरे, आ. बाळाराम पाटील, आ. अनिकेत तटकरे, आ. निरंजन डावखरे, आ. महेंद्र थोरवे, आ. रविंद्र पाटील, आ. महेश बालदी असणार आहेत. या राज्यस्तरीय कार्यशाळेचे स्वागताध्यक्ष आ. भरत गोगावले असणार आहेत. याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

घारापुरी ग्रामपंचायत बिनविरोध

उद्धव ठाकरे शिवसेनेचा भगवा फडकला

। उरण । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींची निवडणूक होत आहे. त्यातील घारापुरी ग्रामपंचायतमधील ७ जागा व सरपंचपद असे एकूण आठ जागांसाठी आठ उमेदवारी अर्ज दाखल झाले असल्याने घारापुरी ग्रामपंचायत बिनविरोध झाली आहे. माजी सरपंच बळीराम ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा उद्धव ठाकरे शिवसेनेचा भगवा फडकला आहे. ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध झाल्याने शिवसैनिकांनी जल्लोष केला. उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी भाजपचे असतानाही

घारापुरी ग्रामपंचायतमध्ये भाजपला एकही उमेदवार मिळू शकला नाही. त्यामुळे भाजपवर नामुष्की ओढावली आहे.

यावेळी नवनिर्वाचित सरपंच व सदस्यांचे जिल्हाप्रमुख तथा माजी आ. मनोहर भोईर, उपजिल्हाप्रमुख नरेश रहालकर, माजी सभापती विश्वास म्हात्रे, माजी शहरप्रमुख महेंद्र पाटील, माजी विभागप्रमुख कमलाकर पाटील व इतर पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

घारापुरी ग्रामपंचायतमधील सदस्यांसाठी ७ जागांसाठी ७ तर सरपंचपदासाठी १ असे एकूण ८ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. घारापुरी ग्रामपंचायतमध्ये विरोधकांनी उमेदवारी अर्ज दाखल केला नाही. त्यामुळे घारापुरी ग्रामपंचायत निवडणूक बिनविरोध झाली आहे. घारापुरी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत बिनविरोध करून एकप्रकारे आम्ही केलेल्या विकासकामांवर शिक्कामोर्तब केला असल्याचे माजी सरपंच बळीराम ठाकूर यांनी सांगितले.

थेट सरपंच उमेदवार महिला आरक्षण मीना मुकेश भोईर, प्रभाग क्रमांक १- बळीराम पद्माकर ठाकूर, हेमाली रुपेश म्हात्रे, अरुणा कमलाकर घरत, प्रभाग क्रमांक २- भरत शंकर पाटील, नीता दिनेश ठाकूर, प्रभाग क्रमांक ३- सचिन मुकुंद लाड, भारती प्रमोद पांचाळ हे उमेदवार बिनविरोध निवडून आले.

प्लॅस्टिकबंदीचा बोजवारा

ठोस उपाययोजनांची गरज

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी परिसरात पातळ प्लॅस्टिक पिशव्यांवरील बंदीचा बोजवारा उडाला आहे. मोहोपाडा बाजारपेठ, रिस व वावेघर बाजारपेठांत सर्रासपणे पिशव्यांचा वापर होत असल्याचे निदर्शनास येत आहे. याबाबत संबंधितांकडून ठोस पावले उचलली जात नसून त्याचा परिणाम पर्यावरणावर होत आहे. द्श

शासनाने ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लॅस्टिकवर बंदी घालण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार जीआर काढून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याचा आदेश देण्यात आला. यावेळी वासांबे मोहोपाडा ग्रुप ग्रामपंचायतीने प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदीची अंमलबजावणी करण्यासाठी ठोस पावले उचलली. यावेळी दुकानदार, फेरीवाल्यांकडून पिशव्या जप्त करण्यात आल्या. गावात काहीकाळाने ही मोहीम थंडावली. यावेळी ग्रामपंचायतीकडून दंडात्मक कारवाईही करण्यात आली होती. सद्य:स्थितीला प्लॅस्टिक पिशव्यांच्या बंदीबाबत विसर पडला असून, दुकानदार आणि फेरीवाल्यांना कोणाची भीती राहिलीच नसल्याचे दिसून येत आहे. अनधिकृत फेरीवाल्यांकडून ग्राहकांना पातळ पिशव्या दिल्या जात असून, दुकानदारही मागे न राहता पिशव्या ठेवत आहेत.

आरसीएफकडून पोलिसांची आरोग्य तपासणी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड थळ आयोजित रायगड पोलिस आरोग्य शिबिराचे शुक्रवारी आयोजन करण्यात आले होते. यावेळी ४० वर्षे वयावरील अधिकारी व अंमलदार यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या शिबिराचे उद्घाटन विशेष पोलीस महानिरीक्षक (कोकण परिक्षेत्र) संजय मोहिते यांच्या हस्ते आणि अनिरुद्ध खाडिलकर कार्यकारी संचालक (थळ) आरसीएफ यांच्या उपस्थितीत अलिबाग येथे जिल्हा पोलीस मुख्यालयात करण्यात आले.

पोलीस अधीक्षक यांच्या

सूचनेवरून पोलीस उपअधीक्षक (गृह) मुख्यालय अलिबाग यांनी केलेल्या विनंतीनुसार अलिबाग उपविभागातील अलिबाग, मांडवा सागरी, रेवदंडा आणि मुरुड ठाण्यातील ४० वर्षे वयावरील अधिकारी व अंमलदार यांच्या आरोग्यतपासणीसाठी आरसीएफतर्फे या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सुमारे २०० स्त्री-पुरुष पोलिस कर्मचाऱ्यांची आरोग्य तपासणी तज्ज्ञ डॉक्टरांकडून या शिबिरात करण्यात आली. यात रक्तदाब, रक्तशर्करा, बीएमआय, सीबीसी/एचबीए १सी, लिपिड प्रोफाईल आणि नेत्रचिकित्सा या तपासण्याचा समावेश आहे.

कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अहोरात्र तत्पर असणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या स्वास्थ्याची काळजी घेत कृतज्ञता व्यक्त करावी या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आरसीएफ थळतर्फे या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, आरसीएफचे मानव संपदा व प्रशासन मुख्य महा व्यवस्थापक श्रीनिवास कुलकर्णी, अति. कार्य. उपविभागीय पोलीस अधिकारी जगदीश काकडे यांसह आरसीएफ व पोलीस अधिकारी उपस्थित होते.

डम्पिंग ग्राऊंडविरोधात नगरपंचायतीवर मोर्चा

राणेची वाडी, आंबेळीतील ग्रामस्थ आक्रमक

। तळा । वार्ताहर ।

तळा शहरातील आंबेळी येथे होत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडविरोधात राणेची वाडी व आंबेळी ग्रामस्थांनी शुक्रवारी तळा नगरपंचायतीवर मोर्चा काढला. तळा पोस्ट ऑफिस ते नगरपंचायत कार्यालय असा हा मोर्चा काढण्यात आला.

आंबेळी येथे होत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडची जागा ही शासनाने आरक्षित गावठाण म्हणून राखीव ठेवली होती. त्या काळामध्ये प्लेगची साथ आल्यामुळे तेथे असलेली वस्ती स्थलांतरित झाली. त्या काळातील वस्तीचे बांधकाम आजही त्या ठिकाणी आहे. मात्र, शासनाने ग्रामस्थांना विश्वासात न घेता सदर गावठाण जागेचा नगरपंचायतीच्या नावाने घनकचरा व्यवस्थापनासाठी सातबारा बनविण्यात आला आहे, असा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात आला आहे. तसेच पुढे जाऊन लोकसंख्या वाढली तर पुढच्या पिढीसाठी जागा उरली नसल्याने सदर जागा गावठाण म्हणून राखीव राहावी, असे निवेदनात म्हटले आहे. याप्रसंगी नगरसेवक भास्कर गोळे, नगरसेविका माधुरी घोलप तसेच राणेची वाडी, आंबेळी, बौद्धवाडी व आदिवासीवाडी ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

केंद्रप्रमुख भरतीला सरकारची मान्यता

५० टक्के पदोन्नतीने, तर ५० टक्के विभागीय स्पर्धांतून भरण्याचे आदेश

। माणगाव । प्रतिनिधी ।

राज्यात कित्येक दिवसांपासून पडलेली केंद्रप्रमुख पद भरती निकाली निघाली असून, १ डिसेंबर रोजी केंद्रप्रमुख भरतीसंदर्भात शासन निर्णय पारित करण्यात आला आहे. केंद्रप्रमुख पदे ५० टक्के पदोन्नतीने व ५० टक्के मर्यादित विभागीय स्पर्धा परीक्षांद्वारे भरण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महाराष्ट्र शिक्षक परिषद प्राथमिक विभागाच्या माध्यमातून गेली तीन वर्ष सातत्याने केंद्रप्रमुख पदे पन्नास टक्के पदोन्नतीने भरण्यात यावी यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा चालू होता.

राज्यात एकूण ४८६० केंद्रप्रमुख पदांपैकी ७० टक्के पदे रिक्त असल्याने शैक्षणिक गुणवत्तेवर

परिणाम होत आहे. अनेक केंद्रांचा पदभार उपशिक्षकांकडे, तर पदवीधर शिक्षकांकडे देण्यात आलेला आहे. रायगड जिल्ह्यात एकूण २२८ केंद्रप्रमुख पदांपैकी फक्त ८० केंद्रप्रमुख कार्यरत आहेत. राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये अशीच अवस्था आहे. आज रोजी किमान ७० टक्के पदे रिक्त आहेत. संघटनेने सातत्याने पाठपुरावा केल्याने अखेर एक डिसेंबर रोजी शालेय शिक्षण विभागाने ५० टक्के पदोन्नतीने व ५० टक्के विभागीय स्पर्धा परीक्षेने पद भरण्याचे निश्चित केलेले आहे.

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर, शालेय शिक्षण सचिव श्री. देओल, शिक्षण आयुक्त सूरज मांढरे, शिक्षक परिषद प्राथमिक विभागाचे संस्थापक आ. संजय केळकर, आ. डॉ. रणजीत पाटील, आ. नागो गाणार, तसेच राज्यातील वेगवेगळ्या पक्षाच्या आमदारांनी शिक्षकांच्या प्रश्नासंदर्भात सातत्याने पाठपुरावा केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे राज्य अध्यक्ष राजेश सुर्वे यांनी आभार मानले आहेत.

तुटलेला विद्युत खांब धोकादायक

महावितरणचे अक्षम्य दुर्लक्ष

। सुधागड-पाली । वार्ताहर ।

सुधागड तालुक्यातील जांभुळपाडा, टाटाचा माळ येथे अर्धवट तुटलेल्या विजेच्या खांबामुळे एका चारचाकी गाडीचे नुकसान झाले होते. येथे लोखंडी खांब बदलून नवीन सिमेंटचा खांब लावण्यात आला आहे. परंतु, लोखंडी खांब रस्त्याच्या दिशेने मान टाकून असल्याने चारचाकी गाडीचा पत्रा कापला गेला. या विजेच्या खांबाकडे महावितरणने दुर्लक्ष केले असून, एखादा मोठा अपघात होऊन जीव जाण्याची महावितरण वाट बघत आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे. टाटाचा माळ येथे रस्त्यालागतच दर्शनी भागात हा खांब असून, हा लोखंडी खांब अर्धवट कापलेल्या स्थितीत चार वर्षांपासून आहे. रात्रीच्या अंधारात हा खांब अपघातास कारण ठरु शकतो. याला सर्वस्वी महावितरण जबाबदार असेल, असा संताप नागरिकांकडून केला जात आहे.

जेएनयूच्या भिंतींवर ब्राह्मणविरोधी घोषणांनी खळबळ

वर्षा मेहता
। अलिबाग ।

दिल्लीतील जवाहरलाल नेहरू युनिव्हर्सिटी (JNU) मधील अनेक भिंती आणि प्राध्यापकांच्या खोल्या काल ब्राह्मण आणि बनिया समाजाविरुद्ध घोषणांनी विद्रूप झाल्या होत्या- ज्याचे फोटो सोशल मीडियावर शेअर करण्यात आले होते, ज्यामुळे एक पंक्ती सुरू झाली होती. जेएनयूच्या कुलगुरूंनी एका निवेदनात या घटनेचा निषेध केला असून, या घटनेच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत.

डीन, स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीज आणि तक्रार समितीला लवकरात लवकर व्हीसीकडे चौकशी करून अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. जेएनयू म्हणजे समावेश आणि समानता. व्हीसी कॅम्पसमध्ये कोणत्याही प्रकारच्या हिंसाचारासाठी शून्य सहनशीलतेचा पुनरुच्चार करतात, असे कुलगुरू म्हणाले. संतश्री पंडित यांचे कार्यालय. सोशल मीडियावर शेअर केलेल्या प्रतिमांमध्ये भिंती आणि प्राध्यापकांच्या खोल्या

SOCIAL MEDIA पडसाद

अशा घोषणांनी रंगवलेल्या दिसत आहेत- शाखाकडे परत जा, ब्राह्मणांनी परिसर सोडला, ब्राह्मण-बनिया आम्ही तुमच्यासाठी येत आहोत आणि रक्त होईल.

विद्यापीठातील अनेक विद्यार्थी आणि शिक्षकांनी दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. आरएसएसशी संलग्न विद्यार्थी संघटना, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (एबीव्हीपी) ने तोडफोडीचा डाव्यांवर आरोप केला. कम्युनिस्ट गुंडांकडून शैक्षणिक जागांची प्रचंड तोडफोड केल्याचा एबीव्हीपी निषेध करतो. कम्युनिस्टांनी गछण च्या स्कूल ऑफ इंटरनॅशनल स्टडीज-खख इमारतीत भिंतींवर अपशब्द लिहिले आहेत. त्यांना धमकावण्यासाठी त्यांनी मुक्त विचारसरणीच्या प्राध्यापकांच्या चेंबरची विटंबना केली आहे, असे एबीव्हीपी ट्विट मध्ये म्हटले आहे.

पान १ वरून

रेतीमाफियांना दणका

ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एक बोट गाळामध्ये फसली असल्याने जागेवरती नष्ट करण्यात आली आहे व १ बोट एन.आर.आय. पोलिसांनी ताब्यात घेतली असून, त्यावर कार्यवाही चालू आहे. तसेच ५ संक्शन पंप नष्ट करण्यात आले आहेत. कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल केलेल्या कारवाईत पाण्यामधून जप्त करुन संबंधित पोलीस स्टेशनच्या ताब्यात देऊन गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रशासनाकडून आजपर्यंतची ही सर्वात मोठी व धडक कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईने वाळू माफिया याचे धाबे दणाणले आहेत.

बिबट्याची दहशत

येत नसल्याने वनविभागाने बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी होत आहे.

साळावचे रहिवासी कृष्णा पाटील यांच्या म्हशीचे रेडके दि. २८ नोव्हेंबर रोजी रात्री दहाच्या सुमारास बिबट्याने रस्सी तोडून जंगलात पळवून नेले, तसेच पठारावरील आदिवासी बांधवाची बकरी गोठ्यातून बिबट्याने पळवून नेली. त्यानंतर दि. ३० नोव्हेंबर रोजी रात्री साडेनऊच्या सुमारास बिबट्याने जोरदार हल्ला चढवीत म्हशीच्या दोन वासरांचा प्राण घेतला.

याबाबतची माहिती समजताच रोहा येथील वनविभागाचे उपवनसंरक्षक व मुरुड वनपरिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली बोर्ली वनपाल वैभव शिंदे, वनरक्षक पंढरिनाथ दिघे, भगवान पिंगळे यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन सदर घटनेचा रितसर पंचनामा करण्यात आला आहे.पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टरांनी म्हशीच्या दोन वासरांचे शवविच्छेदन केले असून, पुढील तपास वनविभागाचे अधिकारी करीत आहेत.

फणसाड जंगलातील बिबटे राजरोसपणे साळाव पंचक्रोशीत फिरत आहेत, याबाबत वनअधिकारी यांना संपर्क केले असता, ते टाळाटाळ करून उडवाउडवीची उत्तरे देतात, अशी ग्रामस्थांची तक्रार आहे. परिसरातील बिबट्याच्या वावराने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. साळाव जेएसडब्ल्यू कंपनीतील कर्मचारी नित्याने येथून रात्री ये-जा करतात व शाळा, कॉलेजमध्ये जाणारे विद्यार्थी पहाटेच्या सुमारास बस स्टँड व मुख्य रस्त्यावर येतात, त्यामुळे बिबट्याचा वावर धोकादायक ठरला असून, मनुष्यहानीची शक्यता नाकारता येत नाही.

याबाबत साळाव ग्रामपंचायतीच्या वतीने सरपंच निलम सागर पाटील यांनी वनक्षेत्रपाल मुरूड यांना तातडीने निवेदनपत्र दिले असून, अतितातडीने निर्णय घ्यावे व कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे. या निवेदनाची प्रत वनविभाग आयुक्त कोकण भवन, जिल्हाधिकारी रायगड, रायगड पोलीस अधीक्षक, विभागीय वनअधिकारी, तहसीलदार मुरूड व पोलीस निरीक्षक रेवदंडा यांना देण्यात आली आहे.

आता घरबसल्या मिळणार सुविधा

नागरिकांना एका क्लिकवर अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. त्यांना आपली घरपट्टी तसेच इतर कर ऑनलाईन पद्धतीने भरणे सुलभ झाले आहे. तसेच कंत्राटदार ई-प्रणालीमुळे कुठलाही कंत्राटदार आपली नोंदणी ऑनलाईन करू शकतो, यामुळे जिल्ह्याबाहेरील ठेकेदार नोंदणी करू लागले आहेत. तसेच कामावाटप प्रणालीमुळे कुठे कोणते काम सुरू आहे याची माहिती सहज खुली झाली आहे. तसेच इतर प्रणालींमुळे नागरिकांना आपल्या भागातील समस्या, तसेच एखादी योजना राबविण्यासाठी आपल्या कल्पनेतील नावीन्यपूर्ण संकल्पना सुचविणे सोयीचे झाले आहे. तसेच निवृत्ती वेतनधारकांसाठी अमृत प्रणाली कार्यान्वित करण्यात आली आहे.

म ह त्त्वा चे

स्मशानभूमीची दुरवस्था

आपटा : पाताळगंगा येथील काळीवली पुलाजवळ असलेल्या स्मशानभूमीची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. या स्मशानभूमीवरील पत्रे पूर्णपणे तुटलेल्या अवस्थेत असून, काही भागातील फरशादेखील फुटल्या आहेत. तसेच बाजूलाच असणाऱ्या दोन्ही स्मशानभूमीवरील लोखंडी पत्रे पूर्णपणे सडले आहेत. तालुक्यातील मोठी व श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून प्रसिद्ध असलेल्या चावणे ग्रामपंचायतीची सदर स्मशानभूमी असून, ग्रामपंचायतीने तात्काळ तिची दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.

पार्किंगअभावी गैरसोय

रसायनी : रसायनी परिसराचा केंद्रबिंदू व मुख्य बाजारपेठेचे ठिकाण असलेल्या मोहोपाडा शहरात वाढत असलेली वसाहत, नवीन झालेले कॉलेजेस, कार्यालये तसेच कारखानदारी व त्यांच्या वसाहती यामुळे मोहोपाडा शहराची लोकसंख्या वाढत आहे. तर वासांबे मोहोपाडा ग्रामपंचायत हद्दीतील लोकसंख्या साठ हजारापेक्षा अधिक असून परिसरात दुचाकी व चारचाकी वाहनांमध्ये वाढ झाली आहे. मोहोपाडा शहरात सायंकाळी नेहमीच ट्रॅफिक जाम होत असून, त्याचा नागरिक व प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. वाहनचालक, ग्राहक व नागरिकांना होणारा त्रास शासनाने दूर करण्याच्या दृष्टीने मोहोपाडा शहरालगत एखाद्या ठिकाणी सुसज्ज वाहन पार्किंग स्थळ तयार करावे, अशी मागणी रसायनीकर करीत आहेत.

दिवसाढवळ्या पाण्याची चोरी

आपटा : पाताळगंगा एमआयडीसीलगत काळीवली पुलासमोर मोठ्या प्रमाणावर बांधकाम सुरू आहे. याठिकाणी बाहेरुन कामगार आले असून, झोपड्या करुन राहात आहेत. एमआयडीसीची पिण्याच्या पाण्याची लाईन येथून गेली आहे. दिवसाढवळ्या येथे पाण्याची चोरी केली जात आहे. याबाबत एमआयडीसी अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहिती नाही, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. तरी, पाणीचोरांविरोधात तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे.

स्व. नमिता नाईक : हसतमुख संवादाची आठवण

भारत रांजणकर

अलिबागकरांच्या मनातील अस्मिता जागी करणाऱ्या अलिबागच्या माजी नगराध्यक्षा स्व. नमिता नाईक यांची अलिबागकरांची एक हक्काचा माणूस म्हणून ओळख निर्माण झाली होती. नगराध्यक्ष म्हणून कार्यरत असताना प्रत्येक नागरिकासोबत हसतमुखाने संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्यात त्यांना आनंद वाटत असे. कुठलेही संकट असो की समस्या तेथे स्वतः पोहोचून मदत करणाऱ्या नमिता नाईक यांना अलिबागकरांनीदेखील विशेष प्रेम दिले.

अलिबागचे नाईक घराणे हे सुसंस्कृत व प्रतिष्ठित घराणे. या नाईक कुटुंबात सन १९४१ ते १९४२ साली रामराव न. नाईक सन १९४४ ते १९४६ अनंत न. नाईक हे नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते. त्यानंतर सुनिता नाईक प्रथम उपनगराध्यक्ष, नंतर थेट निवडणुकीतून नगराध्यक्ष, प्रशांत नाईक, त्यानंतर नमिता नाईक यांनी नगरपालिकेचे नगराध्यक्षपद भूषविले. २००६ च्या नगरपालिका निवडणुकीत नमिता नाईक चांगल्या मताधिक्यांनी नगरसेविका म्हणून निवडून आल्या. त्या प्रशांत नाईक यांच्या पत्नी. या कालावधीत प्रशांत नाईक व नमिता नाईक नगरसेवक व नगरसेविका म्हणून कार्यरत होते. प्रशांत नाईक अध्यक्ष झाले, तर नमिता नाईक विषय समितीच्या सभापती झाल्या. या दोघांनीही आपल्या कामाचा चांगला ठसा उमटविला. २०११ च्या नगरपालिका निवडणुकीत हे दोघेही पुन्हा चांगल्या मताधिक्यांनी निवडून आले. आरक्षणांमुळे नमिता नाईक यांना बिनविरोध नगराध्यक्षपद मिळाले. अलिबागेतच जन्मलेल्या, अलिबागेतच शालेय व महाविद्यालयीन शिक्षण बी.ए.पर्यंत घेतलेल्या नमिता नाईक यांनी आपल्याला मिळालेल्या नगराध्यक्षपदाच्या संधीचे काही दिवसांतच सोने करुन दाखविले.

अलिबाग नगरपालिकेच्या महिला, बालकल्याण समितीच्या सभापती म्हणून कार्यरत असताना नमिता नाईक यांनी अलिबागमधील महिला मंडळे, बचत गटांच्या माध्यमातून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देणे, दिवाळीनिमित्त महिला बचत गटांनी तयार केलेल्या वस्तुंचे प्रदर्शन भरविणे, महिलांसाठी निरनिराळी शिबिरे घेणे, सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्याच्या बाबतीत त्यांचा हातखंडा होता. विविध पदांवर काम करीत असताना त्यांची अभ्यासू वृत्ती, जनसंपर्क, वचक यासारख्या अनेक बाबी उल्लेखनीय होत्या. त्यानंतर नगराध्यक्ष म्हणून कार्यरत असताना प्रत्येक नागरिकासोबत हसतमुखाने संवाद साधून त्यांच्या समस्या सोडविण्यात त्यांना आनंद वाटत असे. मितभाषी आणि हसतमुख असणाऱ्या स्व. नमिता नाईक यांचे रणरागिणीचे रुपदेखील नागरिकांच्या हक्कासाठी पहायला मिळाले. 'अलिबागसे आया है क्या' या संवादाविरोधात त्यांनी आक्रमक होत अलिबागमधील सर्वपक्षीयांना एकत्रित करुन लढा उभारला. त्यासाठी अनेक उपक्रम राबविले.

या उपक्रमांना रायगड जिल्ह्यातूनदेखील चांगला प्रतिसाद मिळाला. त्यासाठी त्यांनी न्यायालयीन लढादेखील लढला. अशा एक ना अनेक आठवणींनी अलिबागकरांच्या मनात कायम जिवंत असणाऱ्या नमिता नाईक यांच्या अवचित जाण्याने अलिबागकरांना मोठा धक्का बसला. हेलावून गेलेले अलिबागकर त्यांच्या स्मृती सदैव मनात जपत आहेत. त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण आदरांजली! ●●

मेरीटाईमकडून सीआरझेडचे उल्लंघन

खोरा बंदर रस्त्यावर बेकायदेशीर कंपाऊंड वॉलचे बांधकाम | स्थानिक रहिवासी सुरेश शिंदे यांची वरिष्ठांकडे तक्रार

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड तालुक्यातील एकदरा ग्रामपंचायत हद्दीतील खोरा बंदर या ठिकाणी असणाऱ्या रस्त्याच्या गटाराच्या बाहेरच्या बाजूला सीआरझेडचे उल्लंघन करून बेकायदेशीर कंपाऊंड वॉल बांधण्याचे काम महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डच्या वतीने सुरू आहे. या बेकायदेशीर बांधकामाविरोधात खोरा बंदरजवळील रहिवासी असणारे अजय सुरेश शिंदे यांनी रितसर निवेदन देऊन सुरू असलेल्या बांधकाम बंद करावे, अशी मागणी यावेळी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड अधिकारी मुरुड व प्रादेशिक अलिबाग याठिकाणी केली आहे.

मेरीटाईम बोर्डाने जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या पर्यटकांसाठी खास ४०० वाहने पार्किंग होतील अशी एक कोटी खर्चून पार्किंग बनवली आहे. पार्किंग बनवून तीन वर्षे झाली, अजूनही उद्घाटन झाले नाही. जेटीपर्यंतचा रस्ता मोठा केला आहे. परंतु, मुख्य रस्त्यावरून जेटीकडे वळताना हार्बरचे कार्यालय आहे. कार्यालयाची भिंत रस्त्यात बांधल्याने रस्ता अरुंद झाला आहे. किल्ला पाहण्यासाठी मोठ्या बस पार्किंगकडे जाताना अडकण्याची भीती निर्माण झाली आहे. भिंत बांधताना रस्ता रुंदीकरणाचा विचार होणे गरजेचे आहे. त्या रस्त्यावरील अनधिकृत बांधकामे पाडून पर्यटकांसाठी रस्ता मोठा करण्याची मागणी अजय शिंदे यांनी केली आहे.

मेरीटाईम बोर्डाने हार्बर कार्यालयाच्या बांधकाम करताना रस्तयाकडील भिंत बांधताना मूळ भिंत सोडून ३ फूट बाहेर आणल्याने रस्ता अरुंद झाला. समोर घर असल्याने रस्त्याची लांबी १५ फूट असल्याने पर्यटकांच्या मोठ्या बस पार्किंगकडे वळताना अडकण्याची शक्यता आहे. खरं तर, मुरुडला पर्यटन विकासासाठी खोरा बंदर महत्त्वाचे ठिकाण आहे. जंजिरा किल्ला पाहण्यासाठी जलवाहतूक मोठ्या प्रमाणात होते. एकावेळी सलग सुटीत हजारो पर्यटक किल्ला पाहण्यासाठी येतात. त्यावेळी वाहतूक कोंडी होते. कार्यालयाच्या या भिंतीमुळे दोन वाहने सोबत जाऊच शकत नाही. पुढील पर्यटन विकासासाठी रस्त्याचे नियोजन आताच करणे योग्य होईल. त्यासाठी केलेले बांधकाम पाठीमागे सरकवण्यात यावे व चालू असलेले काम बंद करण्यात यावे, अशी मागणी यांनी केली आहे.

> कुठेही बेकायदेशीर काम चालू नाही. आमचे जुने ऑफिस होतं, ते पडीक झालं आहे आणि त्याचठिकाणी कंपाऊंड वॉलचं काम चालू आहे. आणि, शासकीय कामांकरिता सीआरझेड येत नाही.
> – समीर बारापत्रे, मेरीटाईम बोर्ड अधिकारी

■ आक्षी ग्रामपंचायतीच्या उमेदवारांनी उमेदवारी अर्ज भरण्याआधी डॉ. अप्पासाहेब धर्माधिकारी यांचे रेवदंडा येथील निवासस्थानी जाऊन आशीर्वाद घेतले. यावेळी माजी सरपंच नंदकुमार वाळंज, शेकापचे ज्येष्ठ नेते कबन नाईक आदी उपस्थित होते.

अर्ज भरण्यासाठी उमेदवारांची झुंबड

। उरण । वार्ताहर।

उरण तालुक्यातील १८ ग्रामपंचायतींच्या निवडणुका या १८ डिसेंबर रोजी पार पडत आहेत. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ही २ डिसेंबर असल्याने उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी उरण येथील निवडणूक निर्णय कार्यालयात मोठ्या प्रमाणात उमेदवारांनी गर्दी केली होती.



उरण तालुक्यात एकूण ३३ ग्रामपंचायती असून, त्यापैकी जसखार, करळ, पाणजे, नवीन शेवा, घारापुरी, डोंगरी, बोकडविरा, भेंडखळ, नवघर, पागोटे, पुनाडे, धुतूम, रानसई, कळंबुसरे, पिरकोन, सारडे, वशेणी अशा १८ ग्रामपंचायतीच्या निवडणुका होत आहेत. या निवडणुकीसाठी भाजप, शिवसेना, शेकाप, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे यांनी गावागावात आघाडी, युतीच्या माध्यमातून भक्कम मोर्चेबांधणी करण्यासाठी सुरुवात केली आहे. शुक्रवारी (दि.२ डिसेंबर) उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने अनेक इच्छुकांनी आपापल्या कुटुंबासह उमेदवारी अर्ज भरण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात गर्दी केल्याचे चित्र पाहावयास मिळत होते.

असंघटित कामगारांनी ऑनलाईन नोंदणी करावी

तहसीलदार विजय तळेकर यांचे आवाहन

। पनवेल । वार्ताहर ।

केंद्र शासनाच्या ई-श्रम योजनेंतर्गत असंघटित कामगारांची जास्तीत जास्त कामगारांची ऑनलाईन नोंदणी केली जावी याकरिता तहसीलदार कार्यालय, पनवेल येथे बैठक घेण्यात आली. ही बैठक विजय तळेकर, तहसीलदार पनवेल, सहाय्यक कामगार आयुक्त शीतल कुलकर्णी, गटविकास अधिकारी संजय भोये, तसेच महापालिका प्रभाग अधिकारी यांच्या उपस्थितीत पार पडली.

या बैठकीस केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने २००८ साली असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम पारीत केलेला आहे. या अंतर्गत असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने असंघटित कामगारांचा डेटाबेस (NDUW) तयार करण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार केंद्र शासनाने २६ ऑगस्ट रोजी असंघटित कामगाराची नोंदणी करण्याकरिता ई-श्रम पोर्टल कार्यान्वित केले आहे. स्वयंरोजगार, घरेलू कामगार, असंघटित क्षेत्रात वेतनावर काम करणारे कामगार, फळ व भाजीपाला विक्रेते, वृत्तपत्रे विक्रेते, विडी कामगार, शेतमजूर, रिक्षाचालक, मुक्त पत्रकार, फेरीवाले व इतर सुमारे ३०० उद्योग-व्यवसायातील कामगार तसेच संघटित क्षेत्रातील इतर कामगार ज्यांना कामगार कायद्याचे संरक्षण नाही असे कामगार नोंदणी करू शकतात. ई-श्रम अंतर्गत सदर नोंदणी पूर्णपणे नि:शुल्क आहे.

ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करण्याकरिता पात्रता वय १६ ते ५९ वर्षे असून, असंघटित क्षेत्रामध्ये काम करणारी कोणतीही व्यक्ती यामध्ये नोंदणी करू शकते. फक्त नोंदणी करणारे कर्मचारी हे कर्मचारी भविष्य निर्वाह निधी आणि कर्मचारी राज्य विमा योजनेचे सभासद नसावेत. सदर नोंदणी केल्यानंतर नोंदित कामगारांना रु. २ लाखाचा अपघाती विमा व अंशत: अपंगत्व आल्यास रु. १ लाखाचा अपघाती विमा मिळणार आहे. या नोंदणीसाठी आधारकार्ड, बँकेचे पासबुक (राष्ट्रीयीकृत बँक अथवा IFSC Code असलेली इतर कोणतीही बँक), स्वतः चा भ्रमणध्वनी क्रमांक अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा भ्रमणध्वनी क्रमांक, ही कागदपत्रे आवश्यक आहे. तसेच स्वयं-नोंदणीकरीता कामगाराचा भ्रमणध्वनी क्रमांक आधारकार्डशी लिंक असणे आवश्यक आहे.

ही नोंदणी अर्जदार स्वतः नागरी सुविधा केंद्रामार्फत करु शकतो. तसेच ई- श्रम पोर्टल URL.eshram.gov.in या अधिकृत वेबसाईवरती जाऊन नोंदणी करता येऊ शकते. या नोंदणीकरिता कोणतेही शुल्क आकारण्यात येत नाही. कामगाराची नोंदणी प्रकिया पूर्ण झाल्यावर कामगारांस नागरी सुविधा केंद्रातील प्रतिनिधीकडून ए-४ आकाराच्या पेपरवर UAN कार्ड काढून देण्यात येईल. अधिक माहिसाठी राष्ट्रीय हेल्पलाईन नं.-१४४३४, टोल फ्री नं.-१८००१३७४१५० या क्रमांकावर संपर्क साधावा. तरी जास्तीत जास्त कामगारांनी ई-श्रम योजनेंतर्गत नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

बॅ. अंतुले यांची पुण्यतिथी साजरी

। पनवेल । वार्ताहर ।

राज्याचे माजी मुख्यमंत्री, कोकणचे भाग्यविधाते बॅरिस्टर ए.आर.अंतुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त पनवेल शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष अभिजीत पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुदाम पाटील, रोजगार व स्वयंरोजगार विभाग पनवेल शहर जिल्हाध्यक्ष भाई म्हात्रे व प्रताप गावंड यांनी आंबेत येथे बॅ. ए.आर. अंतुले यांच्या समाधीचे दर्शन घेऊन आदरांजली वाहिली.

खारघरमधील नाला होतोय मद्यपींचा अड्डा

। पनवेल । वार्ताहर ।

खारघर सेक्टर-११ मधील नाल्यालगत असलेल्या झाडाच्या आड कठड्यावर बसून काही मद्यपी रात्री मद्य प्राशन करीत असल्यामुळे नाला परिसर मद्यपींचा अड्डा म्हणून ओळखला जात असल्याने नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे.

खारघर सेक्टर-६ कडून शिव मंदिरमार्गे सेक्टर-११ कडे जाणाऱ्या नाल्याशेजारी सिडकोने दोन्ही बाजूला मोठ्या प्रमाणात मोकळी जागा सोडली आहे. सदर जागेवर रस्त्यालगत असलेल्या सोसायटी आणि रो हाऊसमधील नागरिकांनी वाहने उभी करण्यासाठी जागेवर कब्जा करुन काहींनी झाडे लावली आहेत. नाल्याच्या कडेला असलेली झाडे आणि रात्री परिसरात अंधार असल्यामुळे मद्यपी झाडाआड आणि नाल्यालगत असलेल्या कठड्यावर रात्री अकरा ते एकदरम्यान मद्य प्राशन करीत आहेत. खारघर सेक्टर-११ मधील नाल्यालगत मद्य प्राशन करु नये, अशी विनंती करुनही काही मद्यपी मद्यपान करतात. मद्य प्राशन करताना अनेक वेळा दोन गटात वाद झाल्याचे प्रकार या परिसरात घडले आहेत.

कर्जतमध्येही रिव्हर राफ्टिंगचा थरार

। कर्जत/नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत रिसॉर्ट मालक भूमिपुत्र संघटना यांच्या सहाय्याने कर्जत येथील पेज नदीवर कर्जत रिव्हर राफ्टिंगचा थरार दि.१ डिसेंबरपासून सुरू झाला आहे. संघटनेचे अध्यक्ष उदय पाटील यांनी श्रीफळ वाढवला आणि सर्व सदस्यांनी प्रथम रिव्हर राफ्टिंग केले.

निसर्ग सौंदर्याचे वरदान लाभलेल्या कर्जतची भुरळ नेहमीच पर्यटकांना पडते. एक-दोन दिवस प्रदूषणमुक्त निसर्गाच्या सान्निध्यात घालवून ताजेतवाने होण्यासाठी अनेक पर्यटक कर्जतला येत असतात.स्थानिक तरुणांनी पर्यटन व्यवसायात प्रगती केली आहे. तालुक्यात येणाऱ्या पर्यटकांना उत्तम प्रतीचे जेवण मिळावे, सुट्टीचा मनमुराद आनंद घेता यावा यासाठी सर्वच सुविधा आपल्या रिसॉर्टवर उपलब्ध करून देण्याचा येथील तरुणाई सातत्याने प्रयत्न करीत आहे. येथे आलेल्या पर्यटकांची उत्तम सोय करून त्यांना फ्रेश करण्याचा प्रयत्न भूमिपुत्र करीत आहेत.

तालुक्यात अनेक पर्यटक यावेत आणि त्या माध्यमांतून किरकोळ व्यवसाय करणाऱ्या तरुणाच्या हाताला काम मिळावे याचा प्रयत्न सातत्याने करीत आहेत. कर्जत रिव्हर राफ्टिंगच्या माध्यमांतून पेज नदीवर चालू झालेला पाच किलोमीटर अंतराचा नागमोडी वळणाने पाण्याचे तुषार अंगावर घेत चित्तवेधक थरार यापुढे अनेक पर्यटकांना आकर्षित करतील.

वीकेंडसाठी हजारो पर्यटक कर्जतमध्ये

कर्जत हा फार्म हाऊस आणि रिसॉर्टचा तालुका बनला असून, येथे शनिवार आणि रविवार हजारो पर्यटक पर्यटनासाठी येत असतात. त्यातील अर्धे पर्यटक माथेरानमध्ये तर अर्धे कर्जत तालुक्यात असलेल्या रिसॉर्टमध्ये पर्यटनासाठी जात असतात. पर्यटकांची वाढती संख्या मागील काही वर्षात वाढू लागल्याने कर्जत तालुक्यात तब्बल अडीच हजार रिसॉर्ट उभे राहिले आहेत. त्यामुळे येणाऱ्या पर्यटकांना अनेक सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या भूमिपुत्र संघटना यांनी आता रिव्हर राफ्टिंगची सुविधा सुरू केली आहे.

> तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपल्या जमिनीत रिसॉर्ट उभे करून पर्यटन केंद्र उभी केली आहेत. त्यासाठी आर्थिक गुंतवणूक केली असून, कर्जत तालुक्यात पर्यटकांच मोठा ओघ लक्षात घेता अल्प दरात रिसॉर्टमध्ये राहण्याची सुविधा मध्यमवर्गीय कुटुंबातील पर्यटक यांच्यासाठी पर्यटनासाठी द्वारे उभी केली आहेत.
> – उदय पाटील, अध्यक्ष, कर्जत रिसॉर्ट मालक भूमिपुत्र संघटना

रिव्हर राफ्टिंग...

कर्जतमधील भिवपुरी वीज गृह येथे वीजनिर्मितीसाठी पुणे जिल्ह्यातील आंद्रा धरणातून पाणी सोडले जाते. त्या धरणातील पाणी खाली आल्यावर पेज नदीमधून पुढे ठाणे जिल्ह्यात जाते. त्या नदीमध्ये बारमाही पाणी असते आणि त्याचा वापर आता रिव्हर राफ्टिंगसाठी होणार आहे. पाच किलोमीटर भागात हे रिव्हर राफ्टिंग सुरू झाले आहे. त्यासाठी राफ्टिंग करणाऱ्या प्रत्येक पर्यटकाला सेफ्टी जॅकेट यांचीदेखील व्यवस्था आहे.

कृषीवलच्या वाचकांना आवाहन

अन्नदान हे श्रेष्ठ दान आहे. आपला वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस तसेच आपल्या नातेवाईक-मित्रांच्या स्मृतिदीनी आपण समाजातील तळागाळातील लोकांना अन्नदान करावे असे आवाहन कृषीवल आपणाला करीत आहे. अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दुर्गम भागातील राहणारे आदिवासी, मोलमजुरी करणारे, गोर-गरीब रुग्ण विविध उपचारांसाठी येथे येत असतात. ज्यांच्याकडे येण्या-जाण्याचे देखील पुरेसे पैसे नसतात आणि यात घरातला कमवता पुरुष जर आजारी असेल तर या लोकांची मोठी आर्थिक कुचंबणा होत असते. यासाठी या ट्रस्टच्या वतीने जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. जिल्हा रुग्णालयात फक्त रुग्णांसाठी जेवणाची सरकारी सोय असते, त्यांच्या सोबत रुग्णालयात राहणाऱ्या नातेवाईकांना जेवण मिळत नाही. अशा परिस्थितीत रुग्णाच्या नातेवाईकाला फार कठीण परिस्थितीला तोंड देऊन पोटाची खळगी भरावी लागते किंबहुना काही वेळेला उपासमारीचीही वेळ त्यांच्यावर ओढावते. त्यांच्या या अडीअडचणी लक्षात घेऊन श्री कच्छी जैन भवनने असाह्य रुग्णाच्या एका नातेवाईकाला एक वेळचे पूर्ण जेवण देण्यास सुरुवात केली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते

स्व. सुमित्राबाई हिंमतमलजी नानेशा, स्मरणार्थ अलिबाग

संपादकीय

बंदी आणि धरसोड

नियम आणि कायदे समाजाच्या भल्यासाठीच असतात. अनेकदा त्यांचं पालन करताना नागरिकांना त्रास होतो. पण अंतिमतः हे नियम सर्वांच्या हिताचे आहेत हे त्यांना पटवून द्यावं लागतं. त्यासाठी नियम करणाऱ्यांच्या मनात त्याबाबत स्पष्टता असावी लागते. शिवाय नियम पाळताना लोकांना होणारा त्रास कमीत कमी कसा होईल हे पाहावं लागतं. पण आपल्याकडचा कारभार सरंजामी पध्दतीने चालतो. सरकारच्या मनात आले की एकाएकी बंदीचा निर्णय घेतला जातो. नंतर अचानक तो मागे घेतला जातो. प्लास्टिकबंदी हे याचे उत्तम उदाहरण आहे. काही तरी निमित्त झाले की सरकारला सुरसुरी येते. मग प्लास्टिकवर बंदी घातल्याच्या घोषणा होतात. व्यापाऱ्यांना आणि नागरिकांना दंडाची भीती घातली जाते. काही अधिकारी उत्साहाने कडक कारवाई करतात. मग मामला थंडावतो. मग सरकार बंदी मागे घेते. अशाच रीतीने एकनाथ शिंदे सरकारने गुरुवारी प्लास्टिक उद्योजकांसमवेत झालेल्या बैठकीनंतर बंदी मागे घेतली. त्यामुळे एकदाच वापरता येणारे प्लास्टिकचे स्ट्रॉ, ताट, कप, ग्लासेस चमचे इत्यादींना पुन्हा परवानगी मिळाली आहे. यापूर्वी देवेंद्र फडणवीस सरकारने मार्च २०१८ मध्ये एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकवर बंदी घालणारी अधिसूचना काढली होती. नंतर २०२१ मध्ये केंद्र सरकारनेही संपूर्ण देशात अशी बंदी घातलीपन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या म्हणजे अगदी पातळ पिशव्यांवर सरकारचा मुख्य रोख होता. आपल्यासारख्या गरीब देशात भाजीपाला, दूध, किराणा वस्तू इत्यादींसाठी सरसकट यांचाच वापर सर्वाधिक होता आणि साहजिकच प्रदूषण करण्यामध्ये त्यांचाच सर्वाधिक वाटा होता. बंदी हटवताना या पातळ पिशव्यांसाठीचे प्लास्टिक विघटनकारी असावे व केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून तसा परवाना मिळालेला असावा अशा अटी घालण्यात आल्या आहेत. मात्र या अटी केवळ मनाच्या समजुतीपुरत्या आहेत. मुळात, दूरवर पसरलेली शहरे व खेडी यांच्यात उपलब्ध पिशव्यांचे प्लास्टिक विघटनकारी आहे की नाही हे तपासणारी यंत्रणा सरकारकडे नाही. शिवाय, असे अपवाद करून बंदीचे निर्णय केले की त्यात हमखास भ्रष्टाचाराला भरपूर वाव निर्माण होतो. त्यामुळे नव्या निर्णयामुळे व्यापाऱ्यांना धमकावण्यासाठी सरकारी अधिकाऱ्यांना आणखी एक निमित्त मिळण्यापलिकडे काहीही साध्य होणार नाही. प्लास्टिक हे सहजासहजी नष्ट होत नसल्याने निसर्ग व पर्यावरण यांच्यासाठी हानिकारक आहे हे सर्वांना पटलेले आहे. महाराष्ट्राचे आता पन्नास टक्के शहरीकरण झाले आहे. या छोट्यामोठ्या शहरांमध्ये प्लास्टिकचा कचरा किती त्रासदायक आहे याचा सर्व जण रोज अनुभव घेत असतात. बहुतांश ठिकाणी पावसाळ्यात गटारे तुंबतात, पूर येतात. पूर्वी हे होत नव्हते. हे सर्व प्लास्टिकमुळे होते हे सर्वांना दिसते. शिवाय भटकी गुरे प्लास्टिक खात असल्याने त्यांना होणारा त्रास सर्वपरिचित आहे. २००६ मध्ये जेव्हा मुंबईत व इतर भागात अभूतपूर्व पूर आला त्यानंतर प्लास्टिकवर पूर्ण बंदीची मागणी उचलून धरली गेली. पण मधल्या काळात आपले जीवन इतके प्लास्टिकमय झाले आहे की त्याची सवय सोडणे हे जनतेसाठीही सोपे नाही. साधा टपरीवरचा चहा किंवा रुग्णालयाबाहेर मिळणारे फळांचे रस वा शहाळ्याचे पाणी यांचे उदाहरण घ्या. प्लास्टिकचा वापर नव्हता तेव्हा लोक चिनीमातीची वा स्टीलच्या भांड्यांचा यासाठी वापर करत होते. पण आता सर्रास थर्माकोलचे कप वा पातळ प्लास्टिकच्या पिशव्या वापरल्या जातात. अलिबागसारख्या छोट्या शहरांमध्येही सुटे दूध घेण्यासाठी स्वतःचे भांडे नेण्याऐवजी प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर सर्वांना सोईचा वाटतो. मात्र तात्पुरती ही सोय दीर्घकालीन आपल्याला महाग पडत असते. हे सर्व जनतेला वारंवार समजावून सांगण्यासाठी सरकारने मोठी मोहीम राबवायला हवी. लोकांना त्यात सहभागी करून घ्यायला हवे. मात्र त्यासाठी सरकारचा हेतू स्वच्छ व ठाम हवा. कडकपणे या निर्णयाची अंमलबजावणी केली जाणार आहे असा विश्वास जनतेत निर्माण व्हायला हवा. प्लास्टिकचे कारखानदार किंवा खाद्यपदार्थ, शीतपेये वा आईस्क्रीमच्या बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या दबावापुढे झुकणार नाही अशी हमी सरकारच्या वर्तनातून मिळायला हवी. ती मिळत नसल्याने असे निर्णय बारगळत जातात. दुर्दैवाने शेवटी यात नुकसान मात्र जनतेचेच होते.

पुन्हा एकवार चुकलेली व्यूहरचना

अजय तिवारी

निवडणुकीत सैनिक, कार्यकर्ते किती यापेक्षा मनोधैर्य फार महत्वाचं असतं. काँग्रेसची स्थिती सध्या पराभूत मानसिकतेतल्या पक्षासारखी आहे. सत्ताधाऱ्यांविरोधातली नाराजी कॅश करता आली तर विरोधी पक्ष सत्तेत येऊ शकतो; परंतु गेल्या आठ वर्षांपासून काँग्रेसमध्ये विजिगिषू वृत्ती पहायला मिळत नाही. सत्ताधारी पक्षाविरोधातल्या नाराजीचं विजयात रुपांतर करण्यासाठी लागणारं संघटन आज काँग्रेसकडे दिसत नाही.

निवडणूक आणि युद्धात बरंच साम्य असतं. दोन्ही ठिकाणी रणनीती, व्यूहनीती महत्वाच्या असतात. युद्धात आणि निवडणुकीत सैनिक, कार्यकर्ते किती यापेक्षा मनोधैर्य फार महत्वाचं असतं. पराभूत मानसिकतेतून दोन्हीला सामोरं जाणं म्हणजे प्रतिपक्षाला मैदान मोकळं असण्याचा संदेश देण्यासारखं असतं. काँग्रेसची स्थिती सध्या पराभूत मानसिकतेत गेलेल्या पक्षासारखी आहे. राजकीय पक्षांना निवडणुका कधी लागणार हे माहीत असतं. सत्ताधारी पक्ष निवडणूक लागण्याच्या अगोदर उद्घाटनांचा धुरळा उडवतात. सत्ता हा सत्ताधारी पक्षांचा जसा फायदा असतो, तसंच सत्तेमुळे निर्माण होणारी नाराजी ही विरोधी पक्षांची पहिली मतपेढी असते. सत्तेतल्या पक्षाविरोधातली नाराजी कॅश करता आली तर विरोधी पक्ष सत्तेत येऊ शकतो; परंतु गेल्या आठ वर्षांपासून सत्तेतून बाहेर फेकल्या गेलेल्या काँग्रेसमध्ये आता विजिगिषू वृत्तीच राहिलेली नाही. सत्ताधारी पक्षाविरोधात भरपूर नाराजी असली, तरी तिचं विजयात रुपांतर करण्यासाठी लागणारं संघटन आज काँग्रेसकडे नाही. काँग्रेसच्या रणनीतीकारांना पक्षाचं काहीच धोरण ठरवता येत नाही. तसं असतं, तर काँग्रेसची 'भारत जोडो' यात्रा गुजरात आणि हिमाचल प्रदेशच्या निवडणुकीनंतर काढली असती; परंतु तसं नियोजन काँग्रेसला करता आलं नाही. हिमाचल प्रदेश विधानसभेची निवडणूक संपली. त्या निवडणुकीत काँग्रेसचा प्रमुख नेता असलेले राहुल गांधी यांनी एकही सभा घेतली नाही.

खरं तर भाजपमधली अंतर्गत बंडाळी आणि सरकारविरोधातली नाराजी तसंच दर पाच वर्षांनी सत्तांतर करण्याची तिथल्या जनतेची मानसिकता लक्षात घेतली, तर या वेळी तिथे काँग्रेसला सत्ता मिळवणं शक्य होतं; परंतु रणांगणातून पळ काढल्यासारखी काँग्रेसची स्थिती होती. एकट्या प्रियांका गांधी यांनी हिमाचल प्रदेशची जबाबदारी सांभाळली. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांनी हिमाचल प्रदेश आणि गुजरात पिंजून काढला. केंद्र सरकारने गुजरातच्या निवडणुकीच्या काळात नेमक्या दिल्ली महानगरपालिकेच्या निवडणुका जाहीर करून 'आम आदमी पक्षा'ची कोंडी केली. अरविंद केजरीवाल यांनी गुजरातमध्ये ज्या पद्धतीने भाजपविरोधात मोहीम उघडली, ते पाहिलं तर त्यांना दोन ठिकाणी प्रचार करताना कसरत करावी लागेल, अशी व्यवस्था भाजपने केली; परंतु त्यालाही केजरीवाल पुरून उरले. अशा परिस्थितीत काँग्रेसनेही गुजरात आणि हिमाचल प्रदेशमध्ये झोकून देऊन काम करणं अपेक्षित होतं. पाच वर्षांपूर्वी काँग्रेसच्या अनेक आमदारांनी पक्षांतर केलं होतं. निवडणूक लढवायलाही उमेदवार मिळत नव्हते. अशा परिस्थितीत योग्य नियोजन केलं आणि काँग्रेसने स्पर्धकांच्या नाकी नऊ आणले होते. भाजपला ९९ वर रोखता आलं. काँग्रेसला ७७ जागा मिळाल्या होत्या.

या पार्श्वभूमीवर या वर्षीच्या गुजरात विधानसभेच्या निवडणुकीत राहुल गांधी यांनी फार अगोदरपासून उतरायला हवं होतं. त्यांनी गुजरात पिंजून काढायला हवा होता. दोन महिने वारंवार गुजरातमध्ये जाऊन पक्षाची बांधणी करायला हवी होती. कार्यकर्त्यांचं मनोधैर्य वाढवायला हवं होतं. याच काळात त्यांनी 'भारत जोडो' यात्रेवर भर दिला. मोदी यांनी आठवड्यातून एक-दोनदा तरी गुजरात भेटीवर भर दिला आहे. आताही ते सतत गुजरात दौऱ्यावर आहेत. 'आप' कडून केजरीवाल, मनीष सिसोदिया यांच्यासह अन्य नेत्यांनी गुजरातवर लक्ष केंद्रीत केलं आहे. गेल्या वर्षापासून 'आप'ने गुजरात टार्गेट केलं असताना काँग्रेस कुठेच नव्हती. त्यामुळे तर काँग्रेसच्या आठ वेळा आमदार राहिलेल्या नेत्यांनीही पक्षाला सोडचिठ्ठी दिली. सैरभैर झालेल्या काँग्रेसच्या नेत्यांनी राहुल गांधी यांच्या सभांची मागणी केली. त्यामुळे 'भारत जोडो' यात्रा महाराष्ट्रातून मध्य प्रदेशमध्ये जाणार असताना दोन दिवस महाराष्ट्रात थांबवून राहुल यांनी सुरत आणि राजकोट इथे सभा घेतल्या. काँग्रेसला स्टार प्रचारक उतरवायला एवढा वेळ का लागला आणि पक्षाला त्याचा काही फायदा होणार की तोटा सहन करावा लागणार, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. राहुल यांनी मध्येच यात्रा आटोपून पुन्हा पुन्हा निवडणूक प्रचारासाठी वेळ काढणं तितकं सोपं नाही. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपला सत्तेतून बेदखल करणं हा ही या यात्रेचा उद्देश आहे. मग काँग्रेसने हिमाचल प्रदेशची निवडणूक एवढ्या अनिच्छेनं का लढवली? भाजप आणि 'आप'ला जणू 'वॉक ओव्हर' का दिला?

हिमाचलच्या संपूर्ण निवडणुकीत राहुल गांधी एकदाही प्रचारासाठी गेले नाहीत. पक्षाच्या मोठ्या नेत्याच्या अनुपस्थितीमुळे कार्यकर्त्यांचं मनोधैर्य खचलं. त्याचा परिणाम निवडणुकीच्या निकालात दिसून येईल, हे उघड आहे. गुजरात निवडणुकीतही राहुल यांना उतरणं भाग पडलं. त्याचं कारण काँग्रेस या निवडणुकीत जिंकावी, म्हणून नाही तर काँग्रेसचं विरोधी पक्षाचं स्थान 'आप' हिसकावून घेतो की काय, अशी भीती निर्माण झाली. भाजपलाही काँग्रेस हाच विरोधी पक्ष म्हणून हवा आहे. 'आप' विरोधी पक्ष झाला तर भाजपची कोंडी होणार आहे. भाजप आणि 'आप' यांच्यात थेट लढत होत असून काँग्रेस तिसऱ्या क्रमांकावर फेकली जात असल्याचं काँग्रेसनेही मान्य केलं आहे का, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अशा प्रश्नांना आणि आरोपांना उत्तरं देण्यासाठी पक्षाच्या रणनीतीकारांना राहुल यांची 'भारत जोडो' यात्रा थांबवून काही वेळ गुजरातच्या प्रचारासाठी द्यावा लागला. गुजरात विधानसभेच्या पहिल्या टप्प्याचं मतदान एक तारखेला तर दुसऱ्या टप्प्याचं मतदान पाच तारखेला होणार आहे. त्यामुळे राहुल यांना 'भारत जोडो' यात्रा मध्य प्रदेशात गेल्यानंतर पुन्हा थांबवून गुजरात विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचाराला जावं लागणार आहे. पक्षाच्या नेत्यांच्या म्हणण्यानुसार, यानंतरही ते दुसऱ्या टप्प्यात काही सभा करणार असून त्याची तारीख अद्याप ठरलेली नाही.

राहुल यांच्या गुजरात दौऱ्याचा निवडणुकीत फायदा होईल, अशी काँग्रेसला आशा असली तरी, राज्यातल्या जनतेला काय वाटतं, हे महत्वाचं आहे. पहिली गोष्ट म्हणजे, आरक्षण आंदोलनाचा नेता हार्दिक पटेल याच्या आवाहनावर २०१७ च्या निवडणुकीत काँग्रेसला पाठिंबा देणाऱ्या पाटीदारांकडून या वेळी पक्षाला विशेष पाठिंबा मिळेल असं वाटत नाही. ग्रामीण मतदार हा काँग्रेसचा पाठिराखा. त्याने आणि पटेल समाजाने मागच्या वेळी काँग्रेसला साथ दिली होती. या वेळी हार्दिक पटेल भाजपच्या तिकिटावर निवडणूक लढवत असल्याने त्यातला मोठा वर्ग भाजपकडे झुकलेला दिसत आहे. दुसरं म्हणजे, राहुल गांधी आपल्या सभांमधून तरुणांना काँग्रेसकडे खेचू शकत नाहीत. यामागील एक प्रमुख कारण म्हणजे केजरीवाल यांनी बेरोजगार तरुणांना दरमहा तीन हजार रुपये बेरोजगार भत्ता देण्याचं आश्वासन देऊन 'आप'कडे आकृष्ट केल्याने पक्षाला मोठ्या प्रमाणात फायदा होऊ शकतो. किंबहुना, या वेळी काँग्रेसच्या अडचणी वाढण्याचं एक मोठं कारण म्हणजे गेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपला अडचणीत आणणारे हार्दिक पटेल, अल्पेश ठाकोर आणि जिग्नेश मेवाणी हे त्रिकूट आता अस्तित्वात नाही. गेल्या वेळेप्रमाणे हे तीन नेते काँग्रेसच्या बाजुने एकत्र उभे राहून प्रचाराचा झंझावात निर्माण करताना दिसणार नाहीत. पाटीदारांच्या आरक्षण आंदोलनाचं नेतृत्व करणाऱ्या हार्दिक पटेलशिवाय अल्पेश ठाकोरनेही भाजपमध्ये प्रवेश केला आहे. अल्पेश यांनी त्या वेळी इतर मागासवर्गीयांना (ओबीसी) एकत्र करण्याचं काम केलं होतं.

जिग्नेश मेवाणी दलित समाजाचे युवा नेते आहेत. गेल्या वेळी ते अपक्ष म्हणून निवडणूक लढवून आमदार झाले होते; मात्र यावेळी मेवाणी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढवत आहेत. ते काँग्रेसला किती अतिरिक्त दलित मतं मिळवून देतात हे पहावं लागेल. श्री. नड्डा यांनी गुजरात, हिमाचल प्रदेश विधानसभेच्या निवडणुकीत अनेक सभा घेतल्या. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे दलित चेहरा असूनही निवडणुकीच्या रिंगणात कुठेही दिसत नाहीत. शिवाय मोदी यांना दिलेली 'मौत का सौदागर', 'नीच' अशी विशेषणं मागे काँग्रेसवरच उलटली होती आणि भाजपने सत्ता हस्तगत केली. आता मोदी यांना उद्देशून वापरलेला 'औकात' हा शब्दही बुमरँगसारखा काँग्रेसवरच उलटण्याची शक्यता नाकारता येत नाही. काँग्रेस दोन राज्यांमधला सामना आपणहूनच गमावत आहे, असं वाटतं.

काश्मीर फाईल्स सिनेमा आणि इतिहास

व्हायरल

कालपासून कश्मीर फाईल्स आणि शिंडलर्स लिस्ट यांची खुळ्यासारखी तुलना चाललेली दिसते. याचं कारण एवढच की हे दोन्ही चित्रपट जेनोसाईडसारख्या विषयावर आधारीत आहेत. नदाव लॅपिड यांनी भाषणात वापरलेल्या व्हल्गर या शब्दांचा अश्लील पलिकडे जाणारा अर्थ माहीत नसणारे लोक त्याच अर्थाने टिका केल्याचं ठामपणे सांगत आहेत. सतीश शाहसारख्या आवडत्या कट्टरनेही काल शिंडलर्स लिस्टबद्दल एक मूर्खासारखी ट्विट केली.

माझं स्वतःचं मतही हेच आहे, की नदाव लॅपिड यांनी व्यासपीठावरुन कश्मीर फाईल्सविषयी बोलण्याची गरज नव्हती. फिल्म त्यांना भडक वाटली, आवडली नाही, पुरस्कार देण्याच्या लायकीची वाटली नाही. संपलं. खास बोलल्याने तिच्याकडे उगाचच लक्ष वेधलं गेलं. कश्मीर फाईल्सवर जी काय चर्चा करायचीय ती झाली की करुन.

सिनेमा अनेक प्रकारचे असतात आणि काही वेळा विशिष्ट मांडणी ही मुद्दाम अंगावर येण्यासाठी केलेली असू शकते. कश्मीर फाईल्समधे ती तशी होती का हे लॅपिड यांनी कसं शोधलं? बरं ज्युरी चर्चेदरम्यान त्यांना ते लक्षात आलं असेल असं धरुन चालू, आणि चित्रपट एका बाजूंचा वाटला हेही धरुन चालू, पण अत्याचार झाले हा भाग खराच आहे. मग त्या अत्याचाराच्या बळींबद्दल सहानुभूती दाखवण्यासाठीही हे स्टेजवर न बोलणं योग्य झालं असतं. त्यांना जे म्हणायचं त्याचं लेखी स्टेटमेंट आय न्ड बी मिनिस्ट्रीकडे देऊन सूचना करणं पुरेसं होतं. आता जो राडा झाला त्यामुळे पुढल्या वेळी होणारी ज्युरी निवड काय निकषांवर होईल हे कळायला मार्ग नाही.

असं असूनही आपण हे लक्षात घ्यायलाच हवं की लॅपिड यांचे उद्गार एका चित्रपटाबद्दलचे होते. एका ऐतिहासिक घटनेबद्दलचे नाही. चित्रपट दर्जाहीन वाटणं म्हणजे घटना खोटी असणं नाही. हॉलोकॉस्टवरही अनेक चित्रपट आलेले आहेत. ते सगळेच शिंडलर्स लिस्ट नाहीत. आणि त्यातल्या चित्रपटांवर जर कोणी प्रामाणिक टीका केली तर ती टीका त्या चित्रपटांवर असेल. ते इतिहासाला खोडून काढणं नाही, आणि तो ज्यू समाजाचा अपमाना नाही. सिनेमा म्हणजे इतिहास नाही, आणि सिनेमाचं कौतुक हा देशाभिमानही नाही.

गणेश मतकरी

.....

शरद पोंक्षेच्या नथुरामनाटका बाबत विजय विल्हेकर यांनी एक प्रयोग केला होता. ते नाटकाला गेले. नाटकात जेंव्हा जेंव्हा गांधीवर गरळ ओकण्यात रंगात यायचा तेंव्हा विजय विल्हेकर उठून महात्मा गांधी की जय म्हणायचा. त्यामुळे शरद पोंक्षेचे गांधी विरोधी अवसान गळून पडायच. शरद पोंक्षेच गांधी विरोधी पुराण नाटकात सुरू झाल की विजय विल्हेकरांच महात्मा गांधी की जय सुरू व्हायचे. याचा परिणाम एवढाच झाला की त्या दिवशीचे नाटक साफ कोसळले. गांधी विरोधी जहर ओकत असतांना त्याचा परिणाम न होता कोणी तरी महात्मा गांधी की जय म्हणतो यानेच त्या दिवशी शरद पोंक्षे खचून गेला. आणि स्वाभाविकपणे नाटक त्या दिवशी पुर्णतः भुईसपाट झाले.

चंद्रकांत वानखेडे

अदृष्टपूर्व हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे।
तदेव मे दर्शय देव रूंप प्रसीद देवेश जगन्निवास ।।४५।।

अदृष्ट-पूर्वम्-पूर्वी कधीही न पाहिलेले; हृषितः-हर्षित; अस्मि-मी आहे; दृष्ट्वा-पाहून; भयेन-भयाने; च-सुद्धा; प्रव्यथितम्-व्याकूळ झाले आहे; मनः-मन; मे-माझे; तत्-ते; एव-निश्चितच; मे-मला; दर्शय-दाखवा; देव-हे प्रभू; रूपम्-रूप; प्रसीद-प्रसन्न; देव-ईश-हे देवाधिदेव; जगत्-निवास-हे जगन्निवास.

पूर्वी मी कधीही न पाहिलेले विश्वरूप पाहिल्यानंतर आनंदित झालो आहे; परंतु त्याचबरोबर भयाने माझे मन व्याकूळ झाले आहे. म्हणून हे देवाधिदेव, हे जगन्निवास! कृपया माझ्यावर प्रसन्न व्हा आणि तुमचे पुरूषोत्तम भगवान रूप प्रकट करा.

तात्पर्यः- अर्जुन हा श्रीकृष्णांचा अत्यंत निकटवर्ती सखा आहे. म्हणून ज्याप्रमाणे एखादा मित्र आपल्या मित्राच्या ऐश्वर्याने आनंदित होतो त्याचप्रमाणे आपला मित्र कृष्ण हा स्वयं पुरूषोत्तम भगवान आहे आणि तो असे अद्भुत विश्वरूपही दाखवू शकतो हे पाहून अर्जुन अत्यानंदित झाला आहे; पण त्याचबरोबर हे विराट रूप पाहून झाल्यावर आपल्या निर्भेळ मित्रप्रेमामुळे श्रीकृष्णांप्रति केलेल्या अपराधांबद्दल त्याला भय वाटत आहे. म्हणून जरी त्याला भयभीत होण्याचे कारण नसले तरी तो भयामुळे अतिशय व्यथित झाला आहे. यास्तव अर्जुन, श्रीकृष्णांना चतुर्भुज नारायणरूप धारण करण्याची विनंती करीत आहे कारण, श्रीकृष्ण कोणतेही रूप धारण करू शकतात. ज्याप्रमाणे हे प्राकृत जगत तात्पुरते आहे त्याचप्रमाणे हे विश्वरूपही भौतिक आणि तात्पुरते आहे. परंतु वैकुंठलोकामध्ये भगवंत दिव्य, चतुर्भुज नारायण रूपात वास करतात. आध्यात्मिक जगतामध्ये असंख्य वैकुंठलोक आहेत आणि प्रत्येक लोकामध्ये श्रीकृष्ण आपल्या विस्तारित रूपाद्वारे निरनिराळी नावे धारण करून वास करतात. या प्रकारे अर्जुनाने वैकुंठलोकातील नारायण रूप पाहण्याची इच्छा प्रकट केली. अर्थात, प्रत्येक वैकुंठलोकामध्ये नारायण चतुर्भुज रूप धारण केलेले असतात. परंतु त्यांनी हातामध्ये निरनिराळ्या प्रकारे शंख, चक्र, गदा आणि पद्म धारण केलेले असते. ज्या ज्या प्रकारे नारायणही शंख, चक्र गदा आणि पद्म धारण करतात त्यानुसार भगवान नारायणांना विविध प्रकारची नावे देण्यात येतात. ही सर्व श्रीकृष्णांचीच रूपे आहेत म्हणून अर्जुन श्रीकृष्णांचे चतुर्भुजरूप पाहण्याची इच्छा व्यक्त करतो.

किरीटिनं गदिनं चक्रहस्त- मिच्छामि त्वां द्रष्टमहं तथैव।
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्त्रबाहो भव विश्वमूर्ते ।।४६।।

किरीटिनम्-किरीटधारी; गदिनम्-गदाधारी; चक्र-हस्तम्-चक्रधारी; इच्छामि-मी इच्छा करतो; त्वाम्-तुम्हाला; द्रष्टुम्-पाहण्याची; अहम्-मी; तथा एव-त्या स्थितीमध्ये; तेन एव-त्यामध्ये; रूपेण-रूप; चतुः भुजेन-चतुर्भुज; सहस्त्र-बाहो-हे सहस्रबाहो; भव-हो; विश्व-मूर्ते- हे विश्वमूर्ती, हे विराट रूप.

हे विश्वमूर्ते, हे सहस्रबाहो भगवान! मस्तकावर मुकुट धारण केलेले आणि शंख, चक्र, गदा, पद्मधारी तुमचे चतुर्भुज रूप मी पाहू इच्छितो. तुम्हाला त्या रूपामध्ये पाहण्यासाठी मी आतुर झालो आहे.

तात्पर्यः- ब्रह्मसंहितेत (५.३९) म्हटले आहे की, रामादिमूर्तिषु कलानियमेन तिष्ठन्-भगवंतांची शेकडो-हजारो शाश्वत रूपे आहेत आणि राम, नृसिंह, नारायण इत्यादी रूपे प्रमुख आहेत. भगवंतांची रूपे ही असंख्य आहेत. परंतु अर्जुनाला माहित होते की, श्रीकृष्ण हे पुरूषोत्तम भगवान आहेत आणि त्यांनीच अनित्य विराट रूप धारण केले आहे. तो भगवंतांना दिव्य नारायण रूप प्रकट करण्याची विनंती करीत आहे. श्रीकृष्ण हे स्वयं आदिपुरूष भगवान आहेत आणि इतर सर्व अवतारांचा त्यांच्यापासूनच उद्गम होतो या श्रीमद्भागवताच्या विधानाला या श्लोकामध्ये स्पष्ट दुजोरा देण्यात आला आहे. ते आपल्या विस्तारित रूपांपासून भिन्न नाहीत आणि असंख्य रूपांतील कोणत्याही रूपांमध्ये ते परमेश्वरच असतात. या सर्व रूपांमध्ये ते एखाद्या युवकाप्रमाणे नवयुक असतात (चिरतरूण) कारण तेच भगवंतांचे शाश्वत रूप आहे जो श्रीकृष्णांना जाणतो तो भौतिक प्रकृतीच्या संसर्गातून तात्काळ मुक्त होतो **(क्रमशः)**

लोकसंसद

बेकारी चिंताजनक

देशातील रोजगाराच्या संधी वाढत आहेत असे सांगणाऱ्या सरकारच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा डेटाबेसचा धक्कादायक रिपोर्ट वर्षभरापूर्वी देशातील ९०% लोकांचे मासिक वेतन २५ हजारांहून कमी होते. ३% लोक १ लाखाहून जास्त कमाई करत होते. जागतिक असमानता डेटाबेस रिपोर्ट-२०२२ नुसार देशात सर्वात कमी उत्पन्न असलेले ५०% आहेत. ते वार्षिक ५३,६१० रुपये कमावू शकतात. म्हणजे महिन्याला ५ हजारांहून कमी. टॉप-१०% लोकांच्या कमाईच्या (११.६६ लाख) तुलनेत तळातील ५०% लोकांचे उत्पन्न २०% कमी आहे. देशाच्या एकूण उत्पन्नात २२% वाटा टॉप १% लोकांचा, तर तळातील लोकांची भागीदारी १३% आहे.६५% संपत्ती टॉप १% वर्गाकडे देशात ५० टक्के सर्वात गरीब लोकसंख्येत प्रत्येक घराची सरासरी संपत्ती ६६, २२० रुपये आहे. मध्यवर्गाच्या तुलनेत ११ पट कमी आहे.देशातील मध्यम वर्गात सरासरी संपत्ती ७.२३ लाख आहे. एकूण संपत्तीचा ६५ % भाग १ टक्के लोकांच्या खात्यात आहे. ते सरासरी ६३.५ लाख रुपये होत. शहरी भागातील पिरियॉडिकल लेबर फोर्सच्या पाहणीनुसार महिलांच्या बेरोजगारी दरात जम्मू-काश्मीर (२९.४ टक्के) नंतर राजस्थानचा (१९.९ टक्के) क्रमांक लागतो. रोजगार; नोकरदार वर्गात वर्षभरात महिला वाढल्या, पुरुष संख्येत घट देशातील चाकरमानींची लोकसंख्या वर्षभरात दर तिमाही वाढली. या दरम्यान नोकरदार महिलांची भागीदारी वाढली आहे. परंतु पुरुषांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून आले. जुलै-सप्टेंबर २०२२ दरम्यान एकूण नोकरदार वर्गात महिलांची भागीदारी गेल्या वर्षीच्या तिमाहीच्या तुलनेत १.४ टक्के वाढली तर पुरुषांचे प्रमाण ०.४ टक्के घटले आहे. २२ राज्यांत १.७१ लाख लोकांवर झालेल्या केंद्राच्या पिरियॉडिक लेबर फोर्स सर्व्हेच्या ताज्या अहवालात हे आकडे समोर आले आहेत.८४ टक्के महिलांना नोकरी नाही देशात १५ वर्षांवरील एकूण लोकसंख्येत ३५ टक्के लोक नोकरी करतात. पैकी एकूण पुरुषांत ५३ टक्के तर महिलांमध्ये १६ टक्के नोकरदार समाविष्ट. लोकसंख्येच्या दृष्टीने पश्चिम बंगालमध्ये सर्वाधिक (३९.५%) नोकरदार. गुजरात (३९.२ %) दुसऱ्या स्थानी आहे तर बिहार (२६.५ %) व यूपी (२९.५%) पिछाडीवर. म.प्र.मध्ये ३३ टक्के, राजस्थानात ३० % नोकरदार आहेत

राजू जाधव, मांगूर

आपलं ठेवायचं झाकून..

'आपलं ठेवायचं झाकून' हे संपादकीय (१ डिसेंबर) आवडलं उच्च न्यायालयातील न्यायाधीशांच्या नेमणुकी संदर्भात कॉलेजियम पद्धतीवरुन केंद्र सरकार आणि सुप्रीम कोर्टातील संघर्ष चालू आहे हे लोकशाहीच्या दृष्टीने घातक आहे. आपल्या संपादकीय मध्येआपण बरोबरच म्हटले आहे की आधीचे सर न्यायाधीश लळीत आणि सध्याचे चंद्रचूड यांच्या काळात न्यायालये कणखर भूमिका घेत आहेत, यामुळेच बहुदा सरकार अस्वस्थ झालेले दिसते. आणि त्यांना शह देण्यासाठी एकीकडे कॉलेजियमच्या शिफारशी अडवायच्या आणि दुसरीकडे कॉलेजियम पद्धतीवर टीका करण्याच्या नावाखाली सरन्यायाधीश व इतरांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवायचे असा हा प्रकार आहे. बरोबर आहे. असा हा संघर्ष म्हणजे कॉलेजियम पद्धतीच्या पारदर्शक प्रतिमेला हरताळ फासण्यासारखे आहे. पंचवीस वर्षापूर्वी ही पद्धत सुरू झाली ज्यामध्ये सुप्रीम कोर्टाचे सरन्यायाधीश आणि चार ज्येष्ठ न्यायाधीश यांची समिती न्यायाधीशांच्या नियुक्ती संदर्भात केंद्राकडे शिफारस करते आणि राष्ट्रपती त्याच्यावर निर्णय घेतात. या पद्धतीने केंद सरकारला आपल्या पाहिजे त्या व्यक्तीची नेमणूक करता येत नाही. तस पाहिल तर ही पद्धत ठिक वाटते. गेल्या पंचवीस वर्षात अशा काय त्रुटी होत्या की केंद्र सरकारमधील कायदे मंत्र्यांना ही पद्धत बदलायला पाहिजे असे वाटते त्यामुळेच त्यांनी सर्व कॉलेजियमने शिफारस केलेल्या सर्व फायली विलंबाने परत पाठविल्या. केंद सरकारने हा संघर्ष टाळायला हवा होता कारण यामुळे वेगळाच संदेश जनतेत पसरतो. त्यामुळे केंद्र सरकार कोणतेही कारण न देता न्यायाधीशांच्या नियुक्त्या प्रलंबित ठेवू शकत नाही. चार महिन्यापासून काही शिफारशी प्रलंबित आहेत हे चांगले लक्षण नाही. हा संघर्ष लवकर संपवणे हेच योग्य ठरेल.

- प्रमोद कडू, नवीन पनवेल

ऋतुराजचा विक्रम

उच्चांक नेहमी मोडण्यासाठीच केले जातात. क्रिकेट या खेळापुरते बोलावयाचे झाल्यास एकाच षटकात ६ षटकार मारण्याचा पराक्रम भारताचे क्रिकेटपटू रवी शास्त्री आणि युवराज सिंह यांनी गतकाळात स्पर्धात्मक सामन्यांमधे केलेला आहे. पण महाराष्ट्राच्या ऋतुराज गायकवाड या युवा खेळाडूने सगळे देशांतर्गत उच्चांक मोडले आहेत. विजय हजारे करंडकाच्या उपांत्यपूर्व सामन्यात उत्तर प्रदेश संघाविरुद्ध खेळताना आघाडीला येऊन त्याने शिवा सिंहच्या एका षटकात ऋनो बॉल'वरही षटकार मारून एकाच षटकात ७ षटकार मारण्याचा विक्रम केला. त्याने एका षटकात ४३ धावा काढल्या. २०१८ साली झालेल्या फोर्ड करंडक सामन्यात सेन्ट्रल डिस्ट्रिक्ट्सविरुद्ध नॉर्दर्न डिस्ट्रिक्ट्सतर्फे खेळताना ब्रेट हॅम्पटन आणि जो कार्टर यांनी संयुक्तपणे केलेल्या जागतिक विक्रमाशी गायकवाडने बरोबरी केली. परंतु एका षटकात सर्वाधिक षटकार मारण्याचा न्यूझीलंडच्या ली जर्मनच्या नावावर असलेला विक्रम अद्याप अबाधितच आहे. जर्मनने शेल करंडक सामन्यात एकाच षटकात ८ षटकार मारले होते.

- अनिल रा. तोरणे, तळेगाव

चालवा डोकं
कृषीवलच्या वाचकांसाठी..

सुडोकू

5	6			1	8	3		
4		3			6	9	2	
	1	7						
	9		8	2				
	2	4	5		3	6	9	
				6	9		1	
						8	5	
	7	5	1			4		9
		2	6	8			3	7

या कोड्याचे उत्तर उद्याच्या अंकात

2	6	7	3	1	8	5	9	4
8	3	4	5	9	6	7	1	2
9	1	5	4	2	7	3	8	6
6	7	3	8	4	9	1	2	5
5	9	8	1	3	2	4	6	7
1	4	2	7	6	5	9	3	8
3	5	1	2	8	4	6	7	9
4	2	6	9	7	1	8	5	3
7	8	9	6	5	3	2	4	1

सोसायटी भाग दाखला (शेअर्स सर्टीफिकेट)

मी.श्री.हरगोविंद एस.भद्रा मे. ग्रीन फिल्ड एंटरप्रायजेस अलिबाग असे जाहीर करतो की, माझे नाव असलेले (शेअर्स सर्टिफिकेट्स) भाग दाखला हा वसंत पुष्प अॅनेक्स फ्लॅट क्र.बी.-००१ चा भागाचा दाखला भाग क्रमांक ४१ ते ४५ पर्यंतचे ५ भाग घेतले होते.

परंतु, सदर भाग दाखला हा माझेकडून नजरचुकीने गहाळ झालेला असून शोध घेतला असता ते कुठेही सापडत नाही.

तरी कोणास सापडल्यास खालील पत्त्यावर संपर्क करावा. ही विनंती आहे.

सही/-
हरगोविंद एस.भद्रा
निल्कनाथ सदन
हिंगवाला लेन
मुंबई
मो.नं.९८६९९३९५०९

जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत, विद्यमान मिळकत मालक **श्री. हरीश धुलाजी परमार** यांचेकडुन रजिस्टर दस्ताऐवजाने विकत घेण्याची ठरवले आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे चेंढरे, ता. अलिबाग जिल्हा-रायगड

मौजे	गट नं.	क्षेत्र (चौ. मी.)	आकार (रु.पे.)
चेंढरे	८७/३/क/३/ड /८	१.६४.००	१७.००

सदरची मिळकत ही वरील मालकाच्या निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असुन ती विकत देण्याचा हक्क व अधिकार असल्याने त्यांनी सदर मिळकती मधील बांधकामासह, लहान- मोठी झाडे, अंर्तभूत हक्क व हितसंबधासह आमचे अशिलास विकत देण्याचे ठरविले आहे. तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर कोणाचा साठेकरार, ताबाकब्जा, गहाण, कुळवहिवाट, दान, बक्षिसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अॅटॅचमेंट किंवा मिळकतीतुन येण्याजाण्याचा मार्ग वगैरे तसेच होणाऱ्या व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत, दावा, तक्रार, अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसाचे आत खाली सही करणार अॅडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. व आमच्या अशिलास नंतर ही मिळकत निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल.

कळावे.

दिनांक. ०२/१२/२०२२

अशिलातर्फे अॅडव्होकेट
सही/-
(अॅड. श्वेता अमित नारे)
गंगासागर, बिल्डींग, बी विंग
पहिला मजला, धुमकरवाडी जवळ,
कलेक्टर ऑफिस रोड, अलिबाग

अॅड.जी.जी.गोंधळी

अलिबाग येथील मे. दिवाणी न्याय.क.स्तर सो यांचे

न्यायालयात
रे.मु.नं.१६२/२०१९
ने.ता.२१/१२/२०२२
नि.३७/ड

जाहीर नोटीस

श्री.अमित अंबरनाथ पाटील ....वादी
विरुद्ध
श्री.प्रेमनाथ काशिनाथ पाटील ....प्रतिवादी

सर्व लोकांस या नोटीसीने असे कळविण्यात येते की,

अमित अंबरनाथ पाटील, रा.रांजणखार, पो.नारंगी, ता.अलिबाग, जि.रायगड यांनी अलिबाग येथील मा.दिवाणी न्यायाधीश सो., क.स्तर यांचे कोर्टात रे.मु.१६२/२०१९ असा ठरावाकरीता व वाटपाकरीता दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात खालील वर्णनाच्या मिळकतीबाबत वाटपाकरीता दावा दाखल केला आहे.

सदर दाव्यात मौजे नारंगीखार, ता.अलिबाग येथील सर्व्हे नं.७९/३अ/३ब/४, एकूण क्षेत्र ०-२६-९० आकार ५-७३ रु.व मौजे नारंगीखार ता.अलिबाग येथील सर्व्हे नं.२२०/२, एकूण क्षेत्र ०-४१-३० आकार ५-०० रू.सदर मिळकतीच्या सरस निरस वाटपाकरीता दावा दाखल केला आहे.

सदर दाव्यात प्रतिवादी नं.३ संतोष काशिनाथ पाटील, रा.नारंगीखार ता.अलिबाग तसेच रा.सुकुल भैया चाल, यादवनगर, सहकार रोड, जोगेश्वरी पश्चिम मुंबई ४००१०२ यांना मे.कोर्टामार्फत अनेकदा नोटीस काढली होती. परंतु सदर प्रतिवादी जाणूनबुजून सदर नोटीस स्विकारत नाही म्हणून दाव्यामध्ये जाहीर नोटीसने बजावणी होणेकरीता सदर नोटीस प्रसिद्ध केली आहे.

सदर दाव्याचे कामी प्रतिवादी स्वतः अगर त्यांचे वकील, अगर त्यांचे प्रतिनिधी, अगर त्यांचे एजंट, अगर अन्य कोणीही मे.कोर्टात २१/१२/२०२२ रोजी किंवा सदर नोटीस प्रसिद्ध केल्यापासून ३० दिवसांच्या आत हजर राहून आपले म्हणणे मे.कोर्टात सादर करावे, तसे न केल्यास सदर दाव्याचे कामी प्रतिवादी ३ यांना काहीही सांगावयाचे नाही. असे समजून मे.कोर्ट प्रतिवादी नं.३ यांचे विरोधात एकतर्फे आदेश करतील याची नोंद घ्यावी.

कनिष्ठ लिपीक
सि.स.ज्यु.डि.सो.
अलिबाग रायगड

कोर्टाचा शिक्का

सहाय्यक अधिक्षक
सिव्हील जज्ज ज्युनिअर डिव्ही सो.
अलिबाग रायगड

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - **मुख्य संपादक**

VACANCY
REQUIRED AN
ASSISTANT CIVIL ENGINEER
FOR ONSITE SUPERVISION IN
ALIBAG
CONTACT NO. 7045790927

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

जाहीर नोटीस

अलिबाग येथील मा. दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.
दिवाणी चौकशी अर्ज नं. १८०/२०२२
नि.११/ड

श्री. सुयोग रमेश नाईक .... अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही.

या जाहीर नोटीशीने तमाम जनतेस कळविण्यात येते की,

अर्जदार हे वरील पत्त्यावर राहत असून त्यांची आई कै. राजश्री रमेश नाईक यांचा मृत्यू आजारपणामुळे दिनांक २६-०५-२०२२ रोजी एम.जी.एम.हॉस्पिटल कामोठे, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड येथे झालेला आहे.

अर्जदार मयत आईचे वारस असल्याबाबत अर्जदार यांनी सक्सेशन दाखला मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज केलेला आहे.

सदर अर्जाबाबत कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्यांनी दि. ९-१२-२०२२ रोजी सकाळी ११.०० वा. मे. कोर्टापुढे सर्व पुराव्यानिशी स्वत: किंवा वकिलांमार्फत हजर राहून आपले म्हणणे मांडावे.

सदरहू मुदतीत जर सदरच्या अर्जास कुणाचीही कसलीही हरकत आली नाही तर मे. कोर्ट अर्जदाराच्या अर्जावर योग्य तो हुकूम करुन अर्जदार याला कायद्याने अर्जदार यांना सक्सेशन दाखला देण्याचा आदेश देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २-१२-२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
कनिष्ठ लिपीक
दिवाणी न्यायाधिश व. स्तर
अलिबाग-रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायाधिश व.स्तर
अलिबाग-रायगड

जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेल्या मिळकती सदर मिळकतींचे विद्यमान मालक सौ. विनया विकास पानसरे यांजकडून खरेदी घेणेचे करार केला आहे. सदर मिळकती निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तुकडी व जिल्हा रायगड, पोट तुकडी व तालुका अलिबाग, **मौजे मापगांव**, ता. अलिबाग येथील :-

विद्यमान मालकांचे नाव	गट क्रमांक	हिस्सा क्रमांक	क्षेत्र हेक्टर आर चौरस मिटर	आकार रु.पै.
विनया विकास पानसरे	१५	१	०-२९-१० पो.ख. ०-०१-०० एकूण ०-३०-१०	६-४४

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकती निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकती विकत घेणेचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे

अलिबाग
दिनांक :- ०३/१२/२०२२

अॅड. रविंद्र वि. ओक
''गुरूकृपा'' महर्षी कर्वे रोड,
अलिबाग को. ऑप. अर्बन
बँकेशेजारी, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

पेपर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे - .

मिळकतीचे वर्णन

मौजे टाकवे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत.

जमिन धारकाचे नाव	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे. ऑर. पॉ.	आकार रु.पै.
शेखर मोरेश्वर शहासने	४९	२ब	०.०५.६०	०.४५

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक - ३/१२/२०२२

अॅड. राजेंद्र पंढरीनाथ निगुडकर
पत्ता. ओम श्री भाग्योदय को. ऑप. हौ. सो.
कोतवाल नगर कर्जत, रायगड
मो. नं. ९८२२७७४०७५ / ८४८४९६५६२६

अलिबाग नगरपरिषद, अलिबाग
जाहीर नोटीस

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम १३० नुसार आवश्यक असल्याप्रमाणे खालील मालमत्तेच्या हस्तांतरणा संबंधाने अलिबाग नगरपरिषद प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या प्रकरण परत्वे अनुसूची २ व ३ मधील नोटीसनुसार सदर हस्तांतरण संदर्भाने कोणच्याही हितसंबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हितसंबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह अलिबाग नगरपरिषदेकडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा कर वसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतरण करुन नगरपरिषद दप्तरी याबाबतची नोंद घेतली जाईल.

अलिबाग नगरपरिषद/जाहीर नोटीस जा.क्र. /२०२२ दि.

अ. क्र.	अनुसूची	अनुसूची पुस्तकातील क्रमांक मालमत्ता क्रमांक	मालमत्तेचे ठिकाण	मालमत्तेचे स्वरुप वर्णन/ब्लॉक/ गाळा वगैरे	ज्याचे नावे मालमत्ता आहे त्यांचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्यांचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याची नावे	खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकन कर्त्याचे नाव
१	२	१९४८/०२३६०	रामनाथ रोड, अलिबाग	पहिला मजला, ब्लॉक नं.१०२	सुमन परशुराम दळवी	धिरज बाळाराम जुईकर व निलम धिरज जुईकर
२	२	८०५/०४०७७	चावडी मोहल्ला अलिबाग	तिसरा मजला, ब्लॉक नं.३०४	श्रीम.कॉंडो अपार्टमेंट प्रा.लि.तर्फे डायरेक्टर लिहून देणार नुरूद्दीन जहांगीर सय्यद	गजेंद्र हरिश्चंद्र नाखवा
३	२	१५६३G/बंदिस्त पत्राशेड/०४७४७	व्यायाम शाळेच्या बाजूला,अलिबाग	सिटी सर्व्हे नं.१४३/२	संमती लिहून देणार रऊफ अब्दुल लतिफ सय्यद वगैरे २	गनी तमिज बागवान व हमिद तमिज बागवान
४	२	१५४०क/०१८२८	पी.एन.पी. अलिबाग	ए.विंग, गाळा नं.२५	अलिबाग तालुका सहकारी सांस्कृतिक कला विकास मंडळ लि.यांच्या तर्फे कुलअखत्यारी म्हणून भगवान रघुनाथ मालपाणी व रमाकांत रघुनाथ वाभळे	उदय कृष्णा गोवरे
५	२	१५४० ब/०१८२५	पी.एन.पी. अलिबाग	ए.विंग, गाळा नं.०९	रमाकांत आर वाभळे	परमेश्वर गजानन गट्टे
६	२	५००/१२/०४३११	मोहिते गल्ली चेंढरे, अलिबाग	तिसरा मजला,निवासी सदनिका नं.३०२	मे.एकॉन्स रिअल्टर्स तर्फे प्रोप्रा शर्मिला अरूण गुलाटी तर्फे अखत्यारी अरूण खजानचंद गुलाटी	सुबोध पंढरीनाथ हुके व प्रगती सुबोध हुके
७	२	१६६२/०१९९९	जिल्हा न्यायालयाजवळ, अलिबाग	पहिला मजला,बी.विंग निवासी सदनिका नं. १०३	श्री.जयंत मधुकर वाखारकर	श्री.कमलाकर व्यकंटेश स्वामी
८	२	७५४/०३६७१	मशिदीजवळ बाजारपेठ, अलिबाग	तळमजला, अे विंग, निवासी सदनिका नं.४	रामकृष्ण विठ्ठल आगटे वगैरे ५	सुनिल दत्तात्रेय शिंदे व सुप्रिया सुनील शिंदे
९	२	१६१९अ/५/०४६७९	ब्राम्हण आळी अलिबाग	दुसरा मजला, ए विंग, फ्लॅट नं.२०२	मे सावित्री कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा मुकेश बी जैन	अनिता शिरीष समेळ व शिरीष चंद्रकांत समेळ
९	२	१६१९अ/५/०४६७९	ब्राम्हण आळी अलिबाग	दुसरा मजला, ए विंग फ्लॅट नं.२०२	मे सावित्री कंन्स्ट्रक्शन तर्फे प्रोप्रा मुकेश बी जैन	अनिता शिरीष समेळ व शिरीष चंद्रकांत समेळ
१०	३	६५१/अ/००८९३	एसटी स्टॅण्ड जवळ, अलिबाग	दुसरा मजला फ्लॅट नं. २०१	मधुकर शंकर ठाकूर	रविंद्र मधुकर ठाकूर
११	२	१९४८/०२३६०	रामनाथ रोड, अलिबाग	तळमजला, वाणिज्य गाळा क्र.२	जागृती योगेश मेहता व चंद्रकांत पांडुरंग कमाने	शुंभागी अरविंद वाघ
१२	२	११०२/१५/०४८५७	मारूती नाका, समुद्र रोड,अलिबाग	पहिला मजला, निवासी सदनिका क्र.१०१	मे.मंदार एंटरप्रायझेस तर्फे पार्टनर रमेश शांताराम काफरे	गणेश विष्णू पाटील व विणा गणेश पाटील
१३	२	११८०/०१४४१	क्रिडाभवन जवळ अलिबाग	तळमजला, निवासी सदनिका क्र.१०२	अरूण तुळशीदास शेठ व मे. कौत्सुभ एंटरप्रायझेस तर्फे श्री. नरेंद्र एस शहा	रविंद्र मधुकर ठाकूर
१४	२	१५४०क/०१८२८	पी.एन.पी.नगर, अलिबाग	बिल्डींग नं.३ पहिला मजला, निवास सदनिका क्र.२	अस्मिता अशोक म्हात्रे	सार्च प्रापॅटीस प्रा.लि.तर्फे डायरेक्टर शुभांगी सुनील सावंत व सार्च प्रापॅटीज प्रा. लि.तर्फे डायरेक्टर जितेंद्र छेडालाल वर्मा
१५	२	१६६२/०२००००	जिल्हा न्यायालयाजवळ अलिबाग	दुसरा मजला सी,विंग निवासी सदनिका क्र.७	नयना सुहास रोगे	अश्विनी अजय पाटील व अजय जनार्दन पाटील
१६	२	४७७क/०३८८६	श्रीबाग ३, अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१	भवानजी शंकरलाल भद्रा	निलेश विश्वनाथ पाटील व तृप्ती निलेश पाटील
१७	२	८७३/०३८४२	जुन्याभाजी मार्केटजवळ अलिबाग	तळमजला सी विंग निवासी सदनिका क्र १०२	फॉरच्युन रीयालिटी तर्फे पार्टनर शमसुद्दीन पल्लवकर व फॉरच्युन रीयालिटी तर्फे पार्टनर रमिज सईद मुल्ला	अब्दुला युसुफ तुंगेकर
१८	२	१४३४/०१७०२	कामत गल्ली, अलिबाग	पहिला मजला,सी विंग निवासी सदनिका क्र. सी -८	मंजिरी मधुकर बोरकर	पंकज प्रकाश घरत
१९	२	५०३/९/०४१३२	मोहिते गल्ली अलिबाग	चौथा मजला, निवासी सदनिका क्र.४०३	रियलटर्स कंम्बाईन्ड तर्फे पार्टनर/अधिकृत स्वाक्षरीकर्ता श्री किरण एन.पाटकर	श्री.नितीन परशुराम ठाकूर व सौ.स्नेहा नितीन ठाकूर
२०	२	१३४७/०१६१५	ब्राम्हण आळी रामनाथ रोड अलिबाग	पहिला मजला,बि विंग निवासी सदनिका क्र. १०३	मे. आकाश बिल्डर्स तर्फे पार्टनर श्री.प्रसाद अनंत जोग	श्री.देवेंद्र केशव लेले
२१	२	१०७१/०४०६७	एसटी स्टॅण्डजवळ अलिबाग	दुसरा मजला, निवासी सदनिका क्र.२०१	जोग इन्फ्रास्ट्रक्चर्स तर्फे प्रो.प्रा. अनंत जोग	ज्योती राकेश चौधरी व राकेश विद्याधर चौधरी
२२	२	४७७/क/०३८८६	श्रीबाग-३, अलिबाग	तिसरा मजला, निवासी सदनिका क्र.४०२	भवानजी शंकरलाल भद्रा	संतोष प्रभाकर राऊळ
२३	२	२/०९३५	श्रीबाग-१ अलिबाग	दुसरामजला, निवासी सदनिका क्र.२	रिमा किशोर हरचंदानी	अतुल चंद्रकांत कोतेकर व ओजस्विनी अतुल कोतेकर
२४	२	७८२/१/०१०७३	बाजारपेठ, अलिबाग	दुसरामजला, निवासी सदनिका क्र.११	प्रविण गोपीनाथ तरे	राकेश राजू मगर
२५	२	१६१९अ/०४७४०	ब्राम्हण आळी अलिबाग	पहिला मजला, ए विंग निवासी सदनिका क्र.१०२	मे.सावित्री कंन्स्ट्रक्शन तर्फे मुकेश बी जैन	ऋतुजा संदीप जाधव
२६	२	८०५/०४०७७	पोस्ट ऑफिस जवळ अलिबाग	तिसरामजला, निवासी सदनिका क्र.३०२	श्रेम कॉडो अपार्टमेंट प्रायवेट लिमिटेड तर्फे नुरूद्दीन जहांगिर सय्यद	अलमास परवेज शेख
२७	२	३७/००२८४२	म्हाडा कॉलनी अलिबाग	तळमजला व पहिला मजला प्लॉट नं.१६ आणि ३७	कांचन पुखराज जैन	शैनाज मोहम्मद बहूर
२८	२	१५६४/०१५७७	एसटी स्टॅण्डजवळ अलिबाग	तिसरामजला ए विंग निवासी गाळा नं.१६	इर्शाद अहमद ल.सैय्यद स्वतःकरिता व अब्दुल रऊफ लतीफ अ सैय्यद	नुजैद बिलाल खान
२९	२	१०५/०२६९४	श्रीबाग-२, अलिबाग	घर	शिवराय शेपप्पा नायक	कृष्णा बारीक पाटील
३०	३	१६००/३/०४५३६	ब्राम्हण आळी रामनाथ रोड अलिबाग	पहिला मजला ए विंग निवासी सदनिका क्र. १०१	सुषमा सुभाष तांबे	सुषमा सुभाष तांबे संदीप यशवंत पराडकर

सही/-
मुख्याधिकारी
अलिबाग नगरपरिषद

म ह त्त्वा चे

मोहन फुंडेकर यांना बंधू शोक

। चिरनेर । वार्ताहर ।

उरण तालुक्यातील चिरनेर रांजणपाडा येथील अनिल जनार्दन फुंडेकर (वय ४७) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. गायक मोहन फुंडेकर यांचे ते सख्खे भाऊ होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी, मुलगा तसेच दोन भाऊ असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर चिरनेर येथील मुक्तिधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय सामाजिक व कला क्षेत्रातील प्रतिष्ठित मंडळी उपस्थित होती. त्यांचा दशक्रिया विधी शुक्रवार दि ९ डिसेंबर रोजी श्रीक्षेत्र चिरनेर खाडी येथे होईल. तर उत्तर कार्य विधी सोमवार दिनांक १२ डिसेंबर रोजी चिरनेर रांजणपाडा येथील राहत्या घरी दुपारी ठीक १२.०० वाजता होणार असल्याची माहिती त्यांचे मेहुणे विनोद फोफेरकर व बहीण रेखा फोफेरकर यांनी दिली.

दुचाकीची चोरी

पनवेल : पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातून मोटार सायकल चोरीस गेल्याची घटना घडली आहे. विचुंबे येथे राहणारे रोहित कांबळे यांनी रेल्वे स्टेशनजवळ उभी केलेली एमएच ४६ एए ६६८९ ही ॲक्टिव्हा चोरीस गेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

अंबा नदी सापडली प्रदूषणाच्या विळख्यात

। पाली/बेणसे । वार्ताहर ।

सुधागड तालुक्याची जीवनवाहिनी असलेल्या अंबा नदीला प्रदूषण आणि घाणीने वेढले आहे. नदीच्या काठावर प्लास्टिक, केरकचरा वाढला आहे. नदीच्या पाण्यावर तवंग व शेवाळ आले आहे. सांडपाणी, प्रदूषित पाणी, घाण व कचरा, वाळू उपसा यामुळे नदीचे नागरिक व प्राण्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. त्याबरोबर नदीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. आंबा नदीच्या पाण्याने पाली गावाची तहान भागते.

पाली शहराला येथील अंबा नदीतून पाणी पुरवठा होतो. तसेच सुधागड तालुक्यातील अंबा नदी शेजारील गावांतील लोक व प्राणी देखील याच पाण्याचा पिण्यासाठी व वापरासाठी वापर करतात. पावसाळ्यानंतर अनेक ठिकाणी बंधारे कार्यान्वीत करुन अंबा नदीचे पाणी अडविले जाते. त्यामुळे या साठलेल्या पाण्यात सध्या मोठ्या प्रमाणात हिरवळ तयार झाली आहे. तसेच नदितून वाहून आलेले प्रदुषित व सांडपाणी पुढे वाहून न जाता येथेच साठून राहते. रासायनिक कंपनीमधून टाकाऊ रसायन हे थेट आंबा नदीत सोडले जाते. तसेच रसायन व सांडपाण्याबरोबरच कचरा आणि घाण देखील साठते. नदीवर महिला कपडे व भांडी धुतात. तसेच नदीत टाकलेले निर्माल्य कुजल्याने देखील पाणी खराब होते. किनाऱ्यावर टाकलेली घाण व कचरा पाण्यात जातो. परिणामी ते अधिक दुषित झाले आहे.

नागरिकांचे आरोग्य धोक्यात | नदी बनतेय डंपिंग ग्राउंड

> अंबा नदीचे पाणी दूषित असल्याने नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. हे प्रदूषण थांबवून अंबा नदी संवर्धनाची व योग्य नियोजनाची गरज आहे. फिल्टरपणी योजना कार्यान्वित झाली पाहिजे.
> - महेश पोंगडे, सामाजिक कार्यकर्ते, पाली

प्राण्यांचे हाल

असंख्य पाळीव व वन्यप्राणी यांचे जीवन अंबा नदीच्या पाण्यावर अवलंबून आहे. दुषित पाण्यामुळे वन्य प्राण्यांना पाण्यासाठी इतर पाण्याच्या स्त्रोताचा शोधा घ्यावा लागतो. त्यांचेही हाल दुषित पाण्यामुळे होत आहेत.

> अंबा नदी पुलावरून जाणारे येणारे नागरिक अनेकदा वाहनात आणलेले घाण, कचरा, पिशव्या व निर्माल्य पाण्यात टाकत असतात. तसेच पाण्याच्या प्रवाहात देखील साहित्य वाहून येते. नदीकाठची घाण कचरा साफसफाईच्या दृष्टीने लवकरच उपाययोजना करण्यात येणार आहे.
> - आरिफ मणियार, प्रभारी नगराध्यक्ष पाली नगरपंचायत

लायन्स क्लब पोयनाडतर्फे नेत्रचिकित्सा

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

लायन्स क्लब पोयनाडच्यावतीने लक्ष्मी ज्वेलर्स, पोयनाडचे नरेश जैन आणि लता जैन यांच्या विवाहाच्या वाढदिवसानिमित्त मंगळवार (२९) लायन्स व्हीजन ॲण्ड हेल्थ क्लिनिक, आंबेपूर-पेझारी येथे मोफत नेत्र तपासणी आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १३० नेत्ररुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यांच्यातील ३५ जणांमध्ये मोतीबिंदू आढळला. या मोतीबिंदू रुग्णांवर चोंढी येथील लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या डोळ्यांच्या हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे.

या शिबिराचे उद्घाटन मुकेश तनेजा यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी अनिल जाधव, प्रदीप सिनकर, अनिल म्हात्रे, नयन कवळे, विकास पाटील, उपाध्यक्ष प्रमोद राऊत, कौस्तुभ जोशी, दिलीप गाटे, प्रगती सिनकर, अरविंद अग्रवाल, संतोष पाटील, विनोद पाटील, हेमंत पाटील, डॉ. शुभदा कुरतडकर, बी.एन. कोळी, सुमीत पाटील, विनोद पाटील, मोहन पाटील, अजय आंगणे, महेंद्र पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी लायन्स क्लब पोयनाडचे अध्यक्ष विकास पाटील यांनी आपल्या प्रास्ताविकातून आपल्या संस्थेच्या कार्याचा आढावा घेतला. सूत्रसंचालन लायन्स हेल्थ फाऊंडेशनच्या डोळ्यांच्या हॉस्पिटलच्या मुख्याधिकारी डॉ. शुभदा कुरतडकर यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर

। माणगाव । वार्ताहर ।

माणगाव तालुका एज्युकेशन सोसायटीचे दोशी वकील आर्ट्स कॉलेज अँड जी.सी.यु.बी. सायन्स अँड कॉमर्स कॉलेज गोरेगाव-रायगड येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय निवासी शिबिर मु. कुशेडे, पो. वडवली, ता. माणगाव येथे उत्साहात सुरू झाले. या शिबिराचा कालावधी २४ ते ३० नोव्हेंबर असा होता.

उद्घाटनासाठी गोरेगाव पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्रीकृष्ण नावले हे होते. यावेळी शांतीलाल मेथा, दिलीप शेठ, प्राचार्य डॉ. जनार्दन होटकर, राम म्हसकर, संजय भुवड, नरेश आग्रे, अविना मोरे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष कदम यांनी केले तर आभार डॉ. भारत खराडे यांनी मानले. या शिबिरामध्ये १०० स्वयंसेवकांनी भाग घेतला आहे.

अवजड वाहनांमुळे नागरिकांना त्रास

। रसायनी । वार्ताहर ।

रसायनी-कोन महामार्गावर सोमाटणे गावाजवळ अपोलो लॉजिस्टीक लिमिटेडकडे येणाऱ्या अवजड मालवाहतूक कंटेनरची पार्कींग मुख्य रस्त्यावरच केली जाते. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांना व छोट्या वाहनांना याचा नाहक त्रास सहन करावा लागत असून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही.

अपोलो लॉजिस्टिक लिमिटेड कंपनीच्या प्रवेशद्वारासमोर ट्रेलरची लांबलचक लाईन लागल्याने अनेकदा वाहतुक खोळंबा होत आहे. यावेळी आजारी पेशंट रुग्णवाहिकेतून नेताना वाहतूक कोंडी होत असल्याने वेळेवर उपचार न मिळाल्याने रूग्णाचा जीव धोक्यात येण्याच्या काही घटना याअगोदर घडल्या आहेत.

रस्त्याचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यात आल्याने अवजड वाहने रस्त्याच्या दोन्ही साईडला पार्किंग केली जात असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.यामुळे दुचाकी, चारचाकी गाड्यांना दोन गाड्यांमधून रस्ता काढणे अवघड होऊन बसले आहे. त्यातच छोटे-मोठे अपघात होत आहेत. छोट्या वाहन चालकांच्या जीवाशी खेळ करत आहेत. शासनाने व वाहतूक शाखेने याकडे त्वरित लक्ष देऊन रस्त्यावरील अवजड वाहनांची होणारी वाहतूककोंडीची समस्या सोडवावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांतून होत आहे.

सानेगांव-यशवंतखार येथे रंगणार कुस्तीचा थरार

। अलिबाग । वार्ताहर ।

रायगड जिल्हा कुस्तीगीर संघातर्फे सानेगांव-यशवंतखार रोहा यांच्या संयोजनाखाली व रोहा तालुका कुस्तीगीर संघाच्या सहकार्याने रविवार (४) स्वर्गीय दिनाभाई मोरे क्रीडांगणावर जिल्हा अजिंक्यपद व निवड चाचणी कुस्ती स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. तालुका कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष तथा रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष माजी जि.प. सदस्य नंदकुमार म्हात्रे व संघाचे सर्व पदाधिकारी ही स्पर्धा उत्तम प्रकारे पार पाडण्यासाठी अहोरात्र मेहनत घेत आहेत. या स्पर्धेसाठी माती व गादी असे दोन आखाडे तयार करण्यात आले असून, या स्पर्धेत सात तालुक्यातील जवळजवळ ४०० खेळाडू सहभागी होणार आहेत. ही स्पर्धा विनातक्रार होण्यासाठी राष्ट्रीय पंच आपली भूमिका बजावणार आहेत.

या स्पर्धेचे उद्घाटन ४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता आ. जयंत पाटील यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी रायगड जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष आ. बाळाराम पाटील, माजी आ. धैर्यशील पाटील, माजी आ. पंडित पाटील, राज्य कबड्डी असोसिएशनचे कार्यवाह ॲड. आस्वाद पाटील, शंकरराव म्हसकर, विनोद पाशिलकर तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, परिसरातील सरपंच, विविध क्रीडा संस्थांचे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

डॉ. सानप यांना सत्यशोधक पुरस्कार

। गोवे-कोलाड । वार्ताहर ।

रायगड रोहा तालुक्यातील तसेच कोलाड विभाग पुई गावाचे डॉ. सागर विठोबा सानप यांना प्रागतिक लेखक संघ व निर्मिती विचारमंच कोल्हापूर यांच्या वतीने सोमवार (दि.२८) राज्यस्तरीय सत्यशोधक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार डॉ.श्रीपाल सबनीस अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन माजी अध्यक्ष व कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रा. डॉ.राजेखान शानेदिवाण ज्येष्ठ साहित्यिक व विचावंत, खा. धैर्यशील माने, खा. निवेदिता माने, डॉ. सुरेश जाधव, विजय कांबळे, डॉ. अरुण भोसले, डॉ. राजेंद्र दास, प्रा. डॉ. प्रशांतकुमार कांबळे, महादेव निर्मिले, सुरज वाघमारे यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला.

माणुसकी प्रतिष्ठानकडून आरोग्य तपासणी

। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।

माणुसकी प्रतिष्ठान शाखा खंडाळा अलिबाग व खासगी मराठी शाळा भाल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती शिबिर प्राथमिक शाळा भाल येथे मुलांची आरोग्य तपासणी तसेच जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी जयवंत गायकवाड, सुरेश पाटील, तानाजी आगलावे, उज्वला चंदनशिव, संपदा माळी, शाळेतील शिक्षक, आशा सेविका अंगणवाडी सेविका, डॉ. जाधव उपस्थित होते. डॉ. राजाराम हुलवान यांनी आरोग्याबद्दल माहिती देत व स्वच्छतेमुळे कसे आपण निरोगी राहू हे सांगितले तसेच जागतिक एड्स दिनाबद्दल माहिती सांगितले. प्राथमिक भाल शाळेच्या मुख्याध्यापिका रेश्मा वारगे यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

सप्ताहाचे आयोजन

। हमरापूर । प्रतिनिधी ।

जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून जागतिक एड्स प्रतिबंध सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने रायगड व ठाणे जिल्ह्यात संस्थे मार्फत विविध प्रकल्पांचे आयोजन करण्यात आले. याअंतर्गत तपासणी शिबिरे, पथनाट्य, रॅली, गुणगौरव इत्यादी कार्यक्रम करण्यात आले. मनोज गावंड पंकज पाटील, आनंद पाटील, सतीश ठाकुर यांनी मार्गदर्शन केले. याकामी राज्य नियंत्रण संस्था, सिव्हिल हॉस्पिटल अलिबाग, संजय माने, रतन गाढवे यांचे सहकार्य लाभले.

द.ग.तटकरे महाविद्यालयात जनजागृती

। तळा । वार्ताहर ।

द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय तळा रायगड यांच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने गुरुवार (१) एड्स दिनानिमित्त विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमाचे निवेदन डॉ. राजाराम थोरात, तर डॉ. दिवाकर कदम यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र सरकारने प्रसारित केलेली एड्स विषयक जनजागृती चित्रफित दाखवण्यात आली. या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्र-प्राचार्य डॉ. भगवान लोखंडे तसेच प्राध्यापक वर्ग व कार्यालयीन कर्मचारी यांची उपस्थिती होती.

जीवनावश्यक वस्तूंचे वाटप

। म्हसळा । वार्ताहर ।

महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.बॅ.ए.आर.अंतुले यांचा सातवा स्मृतिदिन सोहळा म्हसळा येथील वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅ. ए. आर. अंतूले विज्ञान महाविद्यालयामधे संपन्न झाला. यांच्या स्मृती दिनाचे औचित्य साधून तालुक्यातील १०० कुटुंबांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी नाझिम चोगले, मुशताक अंतूले, आर. सी. घरत, फझल हालडे, महंमद तांबे, महादेव पाटील, मच्छिन्द्र जाधव, अक्रम साटविलकर, अहमद अली पेनकर, निजाम कागदी, नासिर मिठागरे, निलम वेटकोळी, अभिजित पाटिल, सुदाम पाटील, भाई म्हात्रे, प्रताप गावंड, साहिल रेळेकर उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.के.एस.भोसले यांनी केले तर आभार प्रा.आर. हालोर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता प्रा.सुमित चव्हाण,प्रा. एस.यु.बेंद्रे, टी.एस.उमासारे आणि विद्यार्थी-विद्यार्थीनी यांनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन प्राध्यापक डी.ए.टेकळे यांनी केले.

व्याख्यानाचे आयोजन

। रसायनी । वार्ताहर ।

जागतिक एड्स दिनानिमित्त श्री समर्थ सामाजिक संस्थेअंतर्गत जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला होता. परिसरातील शाळांमधील ८ वी ते १२ वीच्या किशोरवयीन विद्यार्थ्यांना व्याख्यानामार्फत एड्सबद्दल मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अरविंद पाटील यांनी किशोरवयात होणारे शारीरिक, मानसिक बदल यावर विद्यार्थ्यांसोबत संवाद साधून एड्स आजाराबद्दलची माहिती देऊन त्यांच्या मनातील गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला. या कार्यक्रमास डॉ. पारनेरकर महाराज विद्यालय येथील सर्व शिक्षक विद्यार्थी उपस्थित होते.

जागतिक एड्स दिनानिमित्त रॅली

। नेरळ । वार्ताहर ।

एड्स विषयीच्या जनजागृतीसाठी महाविद्यालयाचा परिसर ते लाडवली गाव येथे रॅलीचे आयोजन यावेळी करण्यात आले होते.

कोकण ज्ञानपीठ कर्जत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत जागतिक एड्स दिनानिमित्ताने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती रॅली तसेच विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

सदर कार्यक्रमात एड्सविषयी जनजागृतीचे महत्व या विषयावरील डॉ. सुजाता कुळकर्णी यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्रभारी प्रा. रवींद्र कटके, डॉ. संगीता दळवी, विजय पवार, अक्षय मस्के, डॉ. सद्गुरुनाथ गायकवाड, प्रा. ए.एस.रेंगे, दीपक जाधव, प्रा. राहुल सुतार, डॉ.सुजाता कुळकर्णी सदर प्रसंगी उपस्थित होते.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बेस्ट करिअरसाठी कोर्सेससाठी, जॉबसाठी, जीवनसाथीप्राप्तीसाठी अचूक इंग्लिश बोलायला शिकवणारे ज्ञानकेंद्र-९८२२८४२८१०
- टॅक्स कन्सल्टंटच्या ऑफिसमध्ये कामासाठी मुलगी पाहिजे. शैक्षणिक पात्रता-बी.कॉम, कॉम्प्युटर व Tally येणे आवश्यक पत्ता-निर्वा कन्सल्टन्सी, आक्षी फोन-९७६३२५३०३१
- अलिबाग एस.टी. स्टँडजवळ दुकानगाळा भाड्याने देणे आहे. ९४२११५८९८५
- अलिबाग, काशिद, बोर्ली, मुरुड, मांडाळ, कोलाड, रोहा, तळा, कसारा, कर्जत, नेरळ : जमीन पाहिजे आजगावकर निवृत्त MIDC ९९२०२५०९४९
- अलिबाग येथे दुकानाचा गाळा (शॉप) व ब्लॉक (सदनिका) भाड्याने देणे आहे. संपर्क : ९८२२०३१०१७, ९०२८५६५९१७

जाहिरातीसाठी संपर्क
☎ (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

पीएनपीच्या खेळाडूंची नेत्रदीपक कामगिरी

। अलिबाग । प्रतिनिधी ।

तालुकास्तरीय आणि जिल्हास्तरीय मैदानी क्रीडा स्पर्धेमध्ये प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीची होली चाईल्ड इंग्लिश मिडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज वेश्वी-गोंधळपाडा शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. सदर स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल नेहुली येथे आणि विभागस्तरीय स्पर्धा मुंबई येथे नुकत्याच पार पडल्या. यामध्ये पीएनपीच्या मुले आणि मुली यांनी नेत्रदीपक कामगिरी केली.

निकेश गरुड (१२ वी सायन्स) थाळी फेक स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक तर भालाफेक द्वितीय क्रमांक, प्रित पाटील १५०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक, करण मगर गोळा फेकमध्ये तृतीय क्रमांक. १४ वर्षाखालील गटात कैवल्य सुरेकर ६०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक तर ४०० मीटर धावणे द्वितीय क्रमांक, ओम पाटील गोळा फेकमध्ये तृतीय क्रमांक, तन्व्हेश कडवे ८० मिटर अडथळा शर्यतमध्ये द्वितीय, १७ वर्षाखालील वयोगटात अन्वेष हाडकर थाळी फेकमध्ये तृतीय, दर्पण म्हात्रे ५००० मिटर चालणे तृतीय तर हातोडा फेकणे या स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांकाने विजयी ठरला. महेश थळे ५००० मिटर चालणे प्रथम क्रमांक, शिव निर्मल ४०० मीटर अडथळा स्पर्धेत तृतीय क्रमांक, वंश कोळी तिहेरी उडी प्रथम क्रमांक, जियाद पठाण १०० मिटर अडथळा शर्यत मध्ये प्रथम क्रमांक, तर कुस्ती स्पर्धेमध्ये ग्रीको रोमनमध्ये विनायक पाटील प्रथम क्रमांक, फ्री स्टाईलमध्ये पारस पाटील द्वितीय क्रमांक, लांब उडी हर्षाली सानप तृतीय क्रमांक. १४ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये भूमी महेश बना १०० मीटर धावणे व २०० मीटर धावणेमध्ये प्रथम क्रमांक, शर्वरी परेश पाटील ६०० मीटर धावणे तृतीय क्रमांक. १७ वर्षा खालील मुलींच्या गटामध्ये आसावरी अमोल पाटील २०० मीटर धावणे तृतीय क्रमांक, ४०० मीटर धावणेमध्ये तृतीय क्रमांक व ४०० मीटर अडथळा शर्यतीमध्ये प्रथम क्रमांक, तन्वी गायकवाड ३००० मीटर चालणेमध्ये प्रथम क्रमांक या खेळाडूंची जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेकरिता निवड करण्यात आली होती. तर जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये १४ वर्षा खालील मुलींच्या गटामध्ये तन्वेश कडवे ८० मीटर अडथळा शर्यत मध्ये द्वितीय क्रमांक, कैवल्य सुरेकर ४०० मीटर धावणेमध्ये चतुर्थ क्रमांक ६०० मीटर धावणे मध्ये चतुर्थ क्रमांक. १७ वर्षा खालील मुलींच्या गटामध्ये वंश कोळी तिहेरी उडीमध्ये तृतीय क्रमांक झियाद पठाण १०० मीटर अडथळा शर्यतमध्ये द्वितीय क्रमांक १७ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये आसावरी पाटील ४०० मीटर अडथळा शर्यतीमध्ये प्रथम क्रमांक तन्वी गायकवाड ३००० मीटर चालण्यामध्ये द्वितीय क्रमांक. विजेत्या खेळाडूंची मुंबई विभागस्तरीय स्पर्धेकरिता निवड करण्यात आलेली आहे.

होली चाईल्ड स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या या नेत्रदीपक यशा बद्दल संस्थेच्या कार्यवाह चित्रलेखा पाटील, प्राचार्य संजय मिर्जी यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर या विजेत्या खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक म्हणून तेजस म्हात्रे आणि अक्षय ढाके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

आता समोसा, आधी सामसा!

गंमत जंमत

मेजेदार, कुरकुरीत आणि रुचकर समोसा तुम्हाला आवडतो ना? भारतात प्रत्येक प्रदेशात गरमागरम चहासोबत समोसा खाल्ला जातो. पावसाळ्यात किंवा हिवाळ्यात गरमागरम समोसे खाल्ल्यावर मन प्रसन्न होतं. चला तर मग, या चटपटीत पदार्थाविषयीच्या अशा काही गोष्टी जाणून घेऊ या. ज्या ऐकून तुम्हालाही आश्चर्य वाटेल!

सर्वप्रथम समोसा हा भारतीय पदार्थ नाही हे समजून घ्या. तुमच्या आवडत्या समोशाची मुळे १० व्या शतकातील आहेत, तेव्हा हा पदार्थ 'सामसा' म्हणून ओळखला जात होता. इराण, मध्य पूर्व प्रदेशात हा पदार्थ खूप लोकप्रिय होता. त्यावेळी समोसे मांस भरून बनवले जात असत. पुढे त्याची रेसिपी इजिप्त, लिबिया, आशियामध्ये पोहोचली जिथे त्याला सॅनबुसाक, सॅनबुसाक आणि सानबुसाज अशी नावं देण्यात आली. समोशाची रेसिपी मुघलांच्या सहवासात दिल्लीत पोहोचली आणि हळूहळू त्यात बदल केले गेले. प्राचीन कथांनुसार, १३ व्या शतकात समोसे फक्त शाही कुटुंबे आणि अरब व मध्य पूर्वेकडील देशांतील उच्चवर्गासाठी राखीव होते. ही डिश खासप्रसंगी तयार केली जात होती आणि राजघराण्यांचा वारसा मानली जात होती.

आपण बटाटे, वाटाणे, पनीर हे घटक समोस्यांमध्ये भरलेले पाहत आलो आहोत, पण तुम्हाला हे जाणून आश्चर्य वाटेल की समोसे हे खरंतर मांस, मेवा, पिस्ता, मसाले आणि औषधांनी बनवले जातात. नंतर तळून ते चटणीबरोबर खाल्ले जायचे. या लोकप्रिय स्नॅकचा आकार पिरॅमिडसारखा आहे. याच कारणामुळे त्याला 'सामसा' हे नाव पडलं, जे थेट इजिप्तच्या पिरॅमिडशी संबंधित आहे. आता समोसा जगभरात इतका लोकप्रिय आहे की, त्याला समर्पित एक खास दिवस आहे. जागतिक समोसा दिवस दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो जेणेकरून प्रत्येकाला या आश्चर्यकारक स्नॅकबद्दल माहिती मिळावी आणि त्याचा आनंद घेता येईल.

करीअर प्लांट ब्रँडिंगमधलं

कोण व्हायचंय?

आपल्या देशातली अध्यर्पिक्षा जास्त लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. आपण आजघडीला एका वर्षात २५० ते २६०० दशलक्ष टन खाद्यान्नाची निर्मिती करतो. भारताच्या एकूण लोकसंख्येला एवढं खाद्यान्न पुरेसं आहे. पण २०२५ पर्यंत आपली लोकसंख्या एवढी वाढणार आहे की अन्नधान्याची कमतरता निर्माण होऊ शकेल. त्यामुळे प्लांट ब्रँडिंगचा विचार जोर धरू लागलाय. म्हणून या क्षेत्रात करीअरच्या अनेक संधी निर्माण झाल्या आहेत. लवकरच अन्नधान्याच्या निर्मितीसाठी आधुनिक उपाय शोधावे लागणार आहेत. विज्ञानाची मदत घेतली जाणार आहे. कृषी उत्पादने वाढवण्यासाठी प्लांट ब्रँडिंगची महत्त्वाची भूमिका आहे. गहू, तांदूळासारखी पिकं प्लांट ब्रँडिंगचं तंत्रज्ञान वापरून तयार करण्यात आली आहेत. ही पिकं दर्जेदार आहेत. देशातली हरितक्रांती प्लांट ब्रँडिंगचाच एक प्रकार आहे.

प्लांट ब्रँडिंगप्रमाणे जेनेटिक्स हा सुद्धा महत्त्वाचा विषय आहे. जंतू, झाडं-झुडुपांच्या उत्पत्तीपासून त्यांच्या उत्क्रांतीपर्यंत विविध विषय याअंतर्गत येतात. जीवसृष्टीची निर्मिती आणि उत्क्रांती हा अत्यंत क्लिष्ट आणि कोड्यात टाकणारा विषय आहे. हे कोडं सोडवायचं असेल तर या विषयाकडे वळता येईल. जेनेटिक इंजिनिअरींगच्या माध्यमातून तुम्ही या क्षेत्रात करीअर करू शकता. तुमच्यासाठी संशोधनाचा मार्गही आहे. यात पी.एचडी करता येईल. दहावी आणि बारावीपासूनच जैव विज्ञानाची तयारी केली जाते. बारावीत विज्ञान विषय घेतल्यानंतर पुढे बायोटेक्नोलॉजी किंवा जेनेटिक्स हा विषय घेता येतो. ग्रॅज्युएशननंतर पुढे शिक्षण घेता येईल.

जेनेटिक्स आणि प्लांट ब्रँडिंगमध्ये एमएससी किंवा पी.एचडी करता येतं. देशभरातल्या कृषी महाविद्यालयांमध्ये जेनेटिक्स तसंच प्लांट ब्रँडिंगविषयीचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. यासाठी अनेक शिष्यवृत्त्याही आहेत. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर खाजगी तसंच सरकारी क्षेत्रात विविध संधी उपलब्ध आहेत. जवाहरलाल कृषी विद्यालय, जबलपूर; आणंद कृषी विद्यापीठ, दिल्ली विद्यापीठ; डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला आदी ठिकाणी अभ्यासक्रम उपलब्ध आहेत.

असा सापडेल हरवलेला फोन

टेक ज्ञान

मित्रांनो, स्मार्टफोन हा आता आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग बनला आहे. आपण दिवसातील बहुतांश वेळ स्मार्टफोनवर घालवतो. अशा परिस्थितीत एखाद्याचा स्मार्टफोन हरवला तर तो खूप अस्वस्थ होणं अगदी स्वाभाविक आहे कारण तो केवळ स्मार्टफोन गमावत नाही, तर त्यामधील संपर्क, संदेशांसह फोटो, व्हिडिओ इत्यादी सर्व काही क्षणात नष्ट होतं. त्याबरोबरच फोनचा गैरवापर होण्याची किंवा त्यातील डेटा लीक होण्याची भीतीही मोठी असते. पण आता आपण सिम, इंटरनेट कनेक्शन आणि कोणत्याही जीपीएस स्थानाशिवायदेखील आपला स्मार्टफोन शोधू आणि ब्लॉक करू शकता. कसा ते बघू या.

फोन हरवल्यानंतर करावी अशी पहिली गोष्ट म्हणजे सिम ब्लॉक करणं. यामुळे कोणीही तुमच्या फोन नंबरवरून चुकीचं काम करू शकणार नाही. यासाठी तुम्हाला कंपनीशी संपर्क साधून सिम बंद करावं लागेल. आता फोन शोधण्यासाठी सर्वप्रथम, तुमच्या स्मार्टफोनमधील IMEI (इंटरनॅशनल मोबाईल इक्विपमेंट आयडेंटिटी) नंबर शोधा. तो तुमच्या फोनच्या बॉक्स आणि बिलामध्ये असतो. ही १५ अंकी संख्या आहे. या नंबरद्वारे तुम्ही फोन ट्रेस करून तो ब्लॉक करू शकता.

IMEI नंबर वापरून फोन कसा ट्रेस करायचा असल्यास सर्वप्रथम तुम्हाला (सीईआयआर) उएखठ च्या वेबसाइटवर जावं लागेल. हे भारत सरकारचं एक व्यासपीठ आहे. ही सेवा सध्या फक्त दिल्ली, महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये उपलब्ध आहे. यानंतर तुम्हाला मोबाईलशी संबंधित सर्व माहिती येथे भरावी लागेल. यामध्ये फोनचा ब्रँड, मॉडेल, शेवटचे लोकेशन यासोबतच बिलाची प्रतही अपलोड करावी लागणार आहे. तसंच इथे तुम्हाला पर्यायी क्रमांकही भरावा लागेल, त्यावर एक ओटीपी येईल. आता तुम्हाला तुमच्या फोनचे शेवटचे लोकेशन टाकावे लागेल. त्यानंतर आणखी ओटीपी येईल ज्यावर तुम्हाला सबमिट बटणावर क्लिक करावे लागेल. शेवटी तुम्हाला एक विनंती आयडी मिळेल जो तुमचा फोन सापडल्यानंतर अनब्लॉक करण्यासाठी उपयुक्त ठरेल. आता तुम्ही सीईआयआर वेबसाइटद्वारे हरवलेल्या फोनची स्थिती तपासू शकता. तुमचा फोन पोलिसांना सापडला तर ते तुम्हाला या पोर्टलद्वारे कळवतील .

हटके संधी शोधताय?

मित्रांनो, कतारमध्ये सुरू असलेला फिफा विश्वचषक अनेक अर्थांनी खास आहे. मध्य आशियातील कोणत्याही देशात पहिल्यांदाच हे आयोजन करण्यात आलेलं नाही, तर सर्व स्टेडियममध्ये प्रथमच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. तेथे नेमून दिलेल्या ठिकाणी कॅमेरे बसवण्यात आले असून, त्याद्वारे चेंडू (फुटबॉल) आणि खेळाडूंच्या स्थितीवर लक्ष ठेवता येईल. तिथे आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या मदतीनं रिअल टाइममध्ये डेटा उपलब्ध होत आहे. सामन्याचा निर्णय घेण्यात रोबोरेफरीही महत्त्वाची भूमिका बजावतील. खेळातील तंत्रज्ञानाच्या वाढत्या हस्तक्षेपाचं हे ताजं उदाहरण म्हणता येईल. आता क्रीडाशास्त्र तंत्रज्ञानाच्या मदतीनं अधिक विकसित होत आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साह्यानं खेळाडूंना त्यांच्या भूतकाळातील आणि वर्तमान कामगिरीची तुलनात्मक माहिती मिळू शकते. यामुळे त्याची कामगिरी सुधारतेच, खेरीज कारकिर्दही लांबू शकते.

मुलांनो, क्रीडा विज्ञान हे एक शास्त्र असून त्यात मानवी शरीर आणि मनाचा अभ्यास केला जातो. या अंतर्गत क्रीडा आणि मानवी शरीर रचना, व्यायाम, शरीरशास्त्र, स्पोर्ट्स बायोमेकॅनिक्स, स्पोर्ट्स सायकॉलॉजी, मोटर कंट्रोल, ट्रेनिंग, शारीरिक शिक्षण, पोषण, योग इत्यादी विषय शिकवले जातात. विद्यार्थ्यांना क्रीडाशास्त्राचे सिद्धांत आणि यांत्रिकी याविषयी सविस्तर समजावून सांगितलं जातं. त्यांना खेळातील कामगिरी, दुखापतीनंतर रिकव्हरी, फिटनेस आणि मानवी शरीराशी संबंधित इतर माहिती दिली जाते. तेव्हा तुम्हीही हटके कारकिर्दीचा विचार करत असाल तर या दोन्ही क्षेत्रांचा अवश्य विचार करा. आगामी काळात त्यात भरपूर संधी उपलब्ध होणार आहेत.

अशा या नद्या

माहीत आहे?

नद्या या देशामधील जीवनवाहिन्या असतात. नदीच्या काठाकाठाने मानवी संस्कृती विकसित झाली हे तुम्ही जाणताच. नद्या स्वच्छ आणि वाहत्या असतील तर त्यावर गुजराण करणारे जीव-जंतू निरोगी राहू शकतात. चला तर आज भारतातल्या मुख्य नद्यांची माहिती घेऊ या.

✻ भारतात वाहणारी सर्वात मोठी नदी म्हणजे सिंधू. कैलास पर्वतात उगम पावणारी ही नदी तब्बल ३,२०० किलोमीटर लांब आहे. ही नदी भारताप्रमाणेच पाकिस्तानातूनही वाहते. भारतात उगम पावलेली ही नदी नंतर पाकिस्तानकडे वळते आणि अरबी समुद्राला मिळते.

✻ भारतात वाहणारी दुसरी मोठी नदी म्हणजे ब्रह्मपुत्रा. ब्रह्मपुत्रेचा उगमदेखील कैलास मानसरोवरमध्ये आहे. ही नदी उत्तर पूर्व भारताची जीवनदायिनी आहे. विशेषत: आसाममध्ये प्रत्येकाला ती आपल्या कुटुंबातील सदस्यांसारखी वाटते. म्हणूनच इथे ब्रह्मपुत्रेचं गुणगौरव करणारी अनेक लोकगीतं ऐकायला मिळतात. ब्रह्मपुत्रेची लांबी २,९०० किलोमीटर इतकी आहे. ती बंगालच्या खाडीला जाऊन मिळते.

✻ भारताला शरीर मानलं तर गंगा हा त्याचा आत्मा आहे. म्हणूनच आपण गंगेला आईसमान मानतो. २,५२५ किलोमीटर लांबीची ही नदी गंगोत्रीमध्ये उगम पावते. त्यानंतर उत्तराखंड, उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल असा प्रवास करत ती परिसर संपन्न करत जाते.

गौरव थिरकला हिंदी गा यावर

व्हायरल वर्ल्ड

सोशल मीडियावर डान्सचे अनेक व्हिडिओ व्हायरल होत असतात. तुम्हीही ते पाहत असाल. तुम्हाला ते आवडतात का? तर मग मुलांनो, गेल्या काही दिवसांपूर्वी एका पाकिस्तानी मुलीचा डान्स व्हिडिओ इंटरनेटवर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला होता. व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये पाकिस्तानातील एक मुलगी लता मंगेशकर यांच्या 'मेरा दिल ये पुकारे आजा' या गाण्यावर सुंदर नाचत असल्यांचं दिसत होतं. तसंच अलिकडे बॉलिवूड गाण्यावरचा एक डान्स व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडिओमध्ये एक नेपाळी मुलगा बॉलीवूडच्या हिट गाण्यावर डान्स करत असल्याचं पाहायला मिळत आहे. हा व्हिडिओ गौरव सितौलानं इन्स्टाग्रामवर 'लहरके बलके' या कॅप्शनसह पोस्ट केला. नाचणाऱ्या मुलाचे नाव गौरव आहे. गौरव ऑन-पॉइंट एक्सप्रेशन्स आणि किलर एनर्जीसह उत्कृष्ट नृत्य करतो. सोशल मीडियावर अनेक यूजर्सनी गौरवच्या डान्सचं कौतुक केलं आहे. विशेष म्हणजे गौरव ज्या गाण्यावर डान्स करत आहे ते २००२ मध्ये आलेल्या 'मेरे यार की शादी है' या चित्रपटातील असून ते गायिका आशा भोसले यांनी गायलं आहे. जावेद अख्तर यांनी ते लिहिले आहे. हा व्हिडिओ शेअर केल्यानंतर त्याला २.२ दशलक्षपेक्षा जास्त व्ह्यूज मिळाले आहेत. या व्हिडिओला लाखो लाईक्स आले आहेत. अनेक युजर्सनी व्हिडिओवर कमेंटही केल्या आहेत. एका यूजरनं लिहिले की, 'यार व्वा, मलाही असा डान्स करता आला असता तर... ' एका यूजरने लिहिलं, 'यार, तू आग लावली आहेस.' गौरवने याच नव्हे तर अनेक बॉलिवूड गाण्यांवर डान्स केले असून ते त्याच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर पोस्टही केले आहेत.



» गाजर खा, तंदुरुस्त रहा

जरा आजूबाजूला पहा बरं, तुम्हाला भाजीविक्रेत्यांकडे रसरशीत भाज्या दिसतील. या रसरशीत भाज्यांचे ढीग किती छान दिसतात ना? पण मित्रांनो भाज्या फक्त पहायच्या नाहीत तर खायच्याही. कारण त्यांच्यापासून मिळणारे पौष्टिक घटक अत्यंत उपयुक्त असतात. आता गाजराचंच घ्या. सध्या गाजराचा हंगाम सुरु आहे. लालभडक रसाळ गाजरं आई घरी आणत असेल. या गाजरांमध्ये लोहाचं प्रमाण भरपूर असतं. म्हणूनच रक्तात लोहाची कमतरता असेल गाजराच्या सेवनाने ती भरून निघते. गाजरामध्ये बीटा कॅरोटीन नावाचं एक उपयुक्त तत्त्व असतं. ते शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये परावर्तित होतं. म्हणजेच गाजराच्या सेवनाने व्हिटॅमिन ए ची कमतरताही भरुन निघते. गाजरामध्ये एक खास प्रकारचं फायबर असतं. या फायबरमुळे शरीरातील विषारी घटक दूर होण्यास मदत होते.

स्टे हेल्दी

शिवाय रक्तप्रवाहही सुरळीत सुरु राहतो. कळली ना गाजराची महती! मग आता गाजर खाण्याचा कंटाळा करु नका. आईला गाजराची कोशिंबीर बनवायला सांगा. हलवा खा. गाजराचा रसही घेऊ शकता.

जिज्ञासा

ओळखा पाहू

१) अमेरिकेतील स्वातंत्र्यदेवतेचा पुतळा कोणत्या देशाने भेट म्हणून दिला आहे?
२) हेडलॉक हा प्रकार कोणत्या खेळात असतो?
३) गोल्फ हा खेळ सर्वप्रथम कोणत्या देशात खेळला गेला?
४) टेडी बिअर हे नाव कशावरून पडलं?
५) गेंड्याचं शिंग कशापासून बनलेलं असतं?
६) अफगाणिस्तानची राजधानी कोणती?
७) कोणता प्राणी आयुष्यात कधीही पाणी पित नाही?
८) मानवी शरीरात किती स्नायू असतात?
९) जगातली पहिली हृदय प्रत्यारोपण शस्त्रक्रिया कोणी केली?
१०) नोबेल पुरस्कार कोणाच्या नावे दिला जातो?

उत्तर १) फ्रान्स २) कुस्ती ३) स्कॉटलंड ४) थेओडोर रूझवेल्ट ५) केस ६) काबुल ७) कांगारू रॅट ८) ६३१ ९) क्रिश्चियन बर्नार्ड १०) अल्फ्रेड नोबेल

करून तर पहा

टीव्हीपासून रहा दूर

मित्रांनो, तुम्ही एकसारखा टीव्ही पाहता का? कधी एकदा अभ्यास संपतो आणि आपण टीव्ही समोर बसतो असं होतं का? तर मग आपल्याला एक वाईट सवय जडतीये हे लक्षात घ्या. खूप काळ टीव्ही बघणं हे एक व्यसनच असतं. म्हणूनच त्यापासून लांब रहा. आपल्याला टीव्हीपासून दूर रहायचंय हे ठरवा आणि शक्यतो तसा प्रयत्न करा. त्यासाठी अभ्यास झाल्यावर मित्र मैत्रिणींबरोबर खेळायला बाहेर जा. आई बाबा टीव्ही पाहत असले तरी तुम्ही दुसरी एखादी ॲक्टिव्हिटी करु शकता.

शिकू या काही

धावपळ टाळू या

शाळेतून आल्यावर युनिफॉर्म कसाही टाकायचा आणि दुसऱ्या दिवशी सकाळी शोधाशोध करायची हे नेहमीच होतं ना? मग आपण ही सवय बदलू या. शाळेतून आल्यावर युनिफॉर्मची घडी करायचा खूप कंटाळा येतोय हे मान्य आहे. पण या कामाला मोजून दोन मिनिटे लागतात. तुम्ही युनिफॉर्म हँगरला अडकवू शकता. सॉक्स-शूज, युनिफॉर्म-टाय, हेअरक्लिप-रबरबँड अशा जोड्या जमवून ठेवल्या तर दुसऱ्या दिवशी सकाळी अजिबात गडबड होणार नाही.

जाणून घ्या

सालांमध्ये असतं सत्त्व

तुम्ही सॅलड कसं खाता? सालं काढून की सालासहित... मित्रांनो, सालांमध्ये जीवनसत्वांचा उत्तम साठा असतो. सालं काढल्यावर हा साठाही दूर होतो आणि आपण त्याचे लाभ मिळवू शकत नाही. म्हणूनच काकडीची सालं काढू नका. गाजर, मुळा, बीटदेखील सालकाढणीने सोलून घेऊ नका. ते तसेच खा. शक्य तितक्या कच्च्या भाज्या खा. मग बघा, कसे हेल्दी रहाल...

मास्टर शेफ

सँडविच बनवा झटपट

तुम्हाला चटपटीत सँडविच खावंस वाटतंय का? पण आई घरी नाही? चला आपणच सँडविच बनवू या. घरी ब्रेड असेल तर काम अगदी सोपं झालं. आधी आपल्याला ब्रेडच्या कडा कापून घ्याव्या लागतील. अशा कडा कापलेल्या ब्रेडवर हिरवी चटणी पसरवा. चटणी नसेल तर टोमॅटो केचप किंवा सॉसही चालेल. आता एका स्लाईसवर काकडी, टोमॅटो, कांद्याचे काप आणि किसलेलं चीज पसरवा. त्यावर दुसरा ब्रेड ठेवा. आता कापून दोन तुकडे करा. हे चविष्ट सँडविच झटपट गट्टम करा.

ठिपके जुळवा





मराठी रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते विक्रम गोखले यांचे अलिकडेच निधन झाले. रुबाबदार अभिनयाचे मालक असलेले गोखले हे एक उत्तम कलाकार तर होतेच, पण इतरांना सांभाळून घेणारे माणूसही होते. त्यांच्या सहकाऱ्यांनी जागवलेल्या काही आठवणी...

विक्रम गोखले
नट आणि माणूस

लोभस राजबिंडा

सुनील सुकथनकर

एक महाविद्यालयीन नाटकवाला म्हणून १९८५ च्या सुमारास त्यांचा बॅरिस्टरचा प्रयोग पाहून भारावून जायला झालं होतं. थोडासा रुमानी हो जाये मधलं त्यांचं राजबिंडं व्यक्तिमत्त्व आणि controlled acting कमालीचं परिणाम करून गेलं होतं. आमच्या जिंदगी जिन्दाबाद (१९९६) या दुसऱ्याच चित्रपटात ते सहज काम करायला तयार झाले. तेंव्हा पोषाख, continuity याबद्दलचा त्यांचा नेटकेपणा पाहून आम्ही पोरं खूप impress झालो होतो. मग आमच्या नितळ (२००६) मध्ये ते ब्रिगेडियर काका बनून आले! संवाद म्हणताना नेहमीची वळणं घेत न जाता अनपेक्षित विरामचिन्हं घेत संवाद फिरवायची त्यांची धाटणी, लयीशी खेळणं जवळून पहाता आलं. त्यांच्या एका नाट्यप्रयोगाला- मला वाटतं - नकळत सारे घडले असावं- गेल्यावर मी आणि सुमित्रा आत भेटायला गेलो. तेंव्हा सर्वांसमोर 'मला घेऊन पुन्हा सिनेमा कधी करणार' असं चक्क ओरडले होते, हेही आठवतं. तो योग आलाच! अण्णा हजारेंचं आंदोलन चालू असताना तो काळ चित्रपटरूपात मांडावा म्हणून सुमित्रानं तातडीनं संहिता लिहिली. आणि या विनाबजेट चित्रपटामागे विक्रमजी खंबीरपणे उभे राहिले. त्यांच्यासह अनेकांच्या सहभागातून हा भारत माझा (२०११) उभा राहिला. ५ D सारखा छोटा digital camera असल्यावर त्यांच्यातला अभिनेता अधिक आनंदी आणि सहज होताना दिसला. यावेळी त्यांचं हुकमी dubbing कौशल्यही दिसलं. या काळात त्यांच्याशी नातं अगदी घरगुती होत गेलं. त्यांच्यापेक्षा दोन वर्षांनी मोठ्या सुमित्राला ते हक्कानं ताई म्हणू लागले! पुण्यात येताना मला साबूदाणा खिचडी बनवून ठेव म्हणून order सोडू लागले. अवयवदान या विषयावर फिर जिंदगी (२०१५) करायचं ठरलं आणि नसिरजी- रत्ना पाठक आणि अनेक मोठ्या कलाकारांबरोबर विक्रमकाका परत सामिल झाले. या आमच्या चित्रपटांमधून त्यांच्याबरोबर काम तर करता आलंच. पण अनेक नाटकं, मालिका, चित्रपट यातून ते दिसत-भेटत रहायचे. त्यांचं लोभस व्यक्तिमत्त्व प्रत्येक भूमिकेत खुलायचं. त्याच्या विरामांची, double take पद्धतीनं बघण्याची नक्कल नवीन पोरं करायची! इतकं ते आकर्षक होतं हे निर्विवाद! गेल्या वर्षी जितू जोशी आणि निखिल महाजनचा गोदावरी पाहिला. त्यातलं विक्रम-आजोबा रूप पाहून काळजात चर्र झालं. ते अभिनय उत्तम करतच होते. पण चेहऱ्यावरचा निष्पाप भ्रमिष्टपणा असणारं ते म्हातारं मूल पाहून कळेना, ही पिढी अशी हातून निसटतेय की काय? हा केवळ चित्रपटातला त्यांचा श्रेज्ञ आहे की त्यांची प्रकृती खालावतेय?

अनेकांना अभिनयाची उमेद देऊन ते गेले. त्यांच्या आजी कमलाबाई गोखले मराठीतल्या पहिल्या-पहिल्या अभिनेत्री वडील चंद्रकांत गोखले यांचाही बॅरिस्टर मधला विकृत सासरा पाहून आम्ही चरकलो होतो. आपल्याला खूप काही देऊन गेलेली ही परंपरा! या परंपरेला वंदन!! ■ ■

मिस यू काका ...

वीरेंद्र प्रधान

का ही माणसे आयुष्यावर प्रभाव पाडून जातात. का, कशासाठी याला बऱ्याचदा उत्तर सापडत नाही. ते स्टेजवर आले की भारावलेले प्रेक्षागृह मी पाहिलंय. मी ही त्यातला एक. काही लोकांशी कारण नसताना कनेक्ट होतो, ओळख नसताना कनेक्ट होतो. तसा माझा झाला. त्यांचा वावर, बोलणं, पाहणं याला कायम एक उंची होती. सतत एका उंचीवरून ते सगळ्यांना पाहायचे. की आपणच बुटके होतो हे समजण्याचं ते वय नव्हत. काहीतरी मोठं आपल्या आजूबाजूला आहे एवढंच कायम वाटायचं, काका सोबत असताना. माझे struggling चे दिवस . काहीतरी करायचं होतं. कसं समजत नव्हतं. मोहन वाघांचं नाटक घरोघरी करायची संधी मिळाली. माझं पहिलं मोठं काम. नाटक पाहायला विक्रम काका आले. झाल्यावर जास्त काही बोलले नाहीत. त्यांनी पाठीवर हात फिरवावा असं आतून वाटत होतं, पण छान केलंस एवढंच म्हणाले आणि गेले. मनात आलं, माझं काम बहुदा आवडलं नसावं. काही दिवसांनी मी आणि कविता (कविता लाड मेढेकर) विक्रम काकांचं मी माझ्या मुलांचा हे नाटक पाहायला गडकरी रंगायतनला गेलो. प्रयोग हाऊसफुल होता पण एक प्रमुख भूमिका करणारा कलावंत नाशिकला अडकल्यामुळे प्रयोग रद्द करण्याचे सोपस्कार सुरू होते. आम्हाला नाटक पाहायला आता मिळणार नाही म्हणून आम्ही खट्टू होतो. तेवढ्यात बाहेर गर्दीत उभ्या असलेल्या आमच्याकडे विक्रम काकांचं लक्ष गेलं. मला जवळ बोलावलं. तूच ना...घरोघरी मधला ? विरेंद्र प्रधान? आयलां... मी थक्क. हो ही बहुतेक म्हणालो नाही. मला म्हणाले- नाटक रद्द होतय. तू करणार का काम? मी पटकन त्यांच्या डोळ्यात पहात हो म्हणालो. माझा त्यांनी हात धरला. स्टेजवर घेऊन गेले. सगळ्या प्रेक्षकांना म्हणाले- याला तुम्ही घरोघरी मध्ये पाहिला आहे. आज हा माझ्यासोबत हातात स्क्रिप्ट घेऊन काम करेल. ज्यांना तिकिटाचे पैसे परत हवे असतील, त्यांना ते मिळतील. एकही प्रेक्षक गेला नाही. सगळ्यांनी ओरडून सांगितलं... विक्रम सर आम्हाला तुम्हाला पहायचं आहे. प्रयोग सुरू करा. विक्रम काकांनी माझ्याकडे अत्यंत आत्मविश्वासाने बघितलं. हात घट्ट हातात धरला. मिठी मारली. म्हणाले - करणार ना विरेन ? एका उंचीवरून देवाने हात दिला होता. मी हो म्हटलं. आणि आम्ही अख्खा प्रयोग दणक्यात केला. मी हातात स्क्रिप्ट घेऊन. अप्रतिम झाला प्रयोग. लोक चुंबकीय आकर्षणाने पहात राहिले आपल्या लाडक्या अभिनेत्याला... आणि विक्रम गोखले यांना. त्यानंतर आमच्यात सुंदर नातं तयार झालं. ते व्हायचंच होत. मी एकदा म्हटलं- काका मला सीरियल करायची आहे. म्हणाले-कर. मी आहे सोबत. मी मित्रांच्या मदतीने तयारी केली. त्यांना म्हणालो-विक्रम काका मला तुमचा एक दिवस हवाय. पैसे नाहीत माझ्याकडे. म्हणाले येतो. हो म्हणून 'हम दिल दे चुके सनम' करायला निघून गेले. संजय लीला भन्साळीला, एक दिवसासाठी थांबवून, फक्त माझ्यासाठी राजस्थान वरून पुन्हा आले. सोबत केली. मदत केली. आशिर्वाद दिला. जो आजपर्यंत पुरतोय मला. नंतर आम्ही या सुखांनो या मालिका केली. बऱ्याच एपिसोड्सनंतर, निर्माते काही कारणास्तव माझ्या विरोधात गेले तेव्हा माझ्यामागे भक्कमपणे उभे राहिले ते फक्त विक्रम काका. निर्माते मानाने अत्यंत मोठे होते पण विक्रम काका त्यांना म्हणाले-विरेन ही मालिका दिग्दर्शित करणार नसेल तर मी या मालिकेत काम करणार नाही. एक ना अनेक प्रसंग आहेत. कायम मनावर कोरले जातात. हा कनेक्ट होता. दैवी कनेक्ट होता. कायम होता. राहील. ते आज ही एका उंचीवर आहेत. कायम असतील. बोलण्यासारखे, सांगण्यासारखे खुप आहे. पण मला आता बुटकं रहायचंय. खुप कमी हाताच्या बोटावर मोजता येतील अशी ही उंच माणसं राहिली आहेत. पिढ्या घडवल्या या लोकांनी. त्यांच्या स्पष्टवक्तेपणामुळे त्यांचे खुप विरोधक ही झाले असतील. आयुष्य आहे. ते अडखळत, तरल वाहणार हे आलंच ओघाने. आज हा विक्रम गोखले नावाचा महासागर आकाशाला मिळाला. उंचीवर होताच. आज अजून उंच झाला. ■ ■

तो जगप्रसिद्ध पॉझ

शिरीष लाटकर

या सुखांनो या मालिकेच्या सेटवर मला ते मला पहिल्यांदा भेटले.

समोर मीच लिहिलेल्या सीनची रिहर्सल सुरु होती.

सगळ्या कलाकारांचा सीन वाचून झाला. माझे डोळे त्यांच्यावर खिळले होते.

कान त्यांच्या प्रतिक्रियेसाठी आसुसले होते.

त्यांच्याकडून मात्र तोच तो जगप्रसिद्ध पॉझ.

आणि मग आलेली धीरगंभीर प्रतिक्रिया .. 'उत्तम'..

त्या एक शब्दाने आमच्यातलं अंतर कितीतरी कमी केलं..

दि विक्रम गोखले सेटवरून निघेपर्यंत 'विक्रम काका' बनले ते अगदी आजतागायत..

तसं पहायला गेलं तर विक्रम काकांच्या कितीतरी आठवणी आहेत. खूपशा या सुखांनो या च्या काळातल्याच आहेत.. या काळात मी त्यांची कितीतरी रूपं पाहिली. मालिकेत ते दादा अधिकारी या दत्तगुरुंचा साक्षात्कार असलेल्या अध्यात्मिक गुरुची भूमिका करायचे. या भूमिकेला त्यांनी इतकं जिवंत केलं होतं की कुठेही गेले तरी प्रेक्षक त्यांच्या पाया पडायचे. आणि मग हमखास त्यांचा मला फोन यायचा. मिश्किल दटावत ते म्हणायचे, 'काय करून टाकलंयस रे तू माझं..' मी ही म्हणायचो, 'काका तुम्ही इतके खरे वाटता त्याला मी काय करू?' मग दिलखुलास हसायचे. ते हसू अजूनही कानात आणि मनात तसंच आहे.

त्याचदरम्यान एकदा काही कारणाने मी हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होतो.. अगदी दोन दिवस.. नेमका त्याच वेळी काकांनी काही कारणाने मला फोन केला... मोबाईल बंद होता म्हणून चौकशी केली तर मी ॲडमिट असल्याचं कळलं.. काकांनी हॉस्पिटलचं नाव जाणून घेतलं आणि हॉस्पिटलच्या लँड लाईनवर फोन केला.. माझ्यासाठी दस्तुरखुद्द विक्रम गोखलेंचा फोन म्हटल्यावर अवघं हॉस्पिटल माझ्याकडे पहात होतं.. मला सेलिब्रिटी असल्याचा पहिला फील देणारे खऱ्या अर्थाने विक्रम काकाच होते आणि फोनवर आल्यावर उबदार स्वरात काळजी घे रे म्हणून त्यांनी दिलेला धीर अजून ही लक्षात आहे..

विक्रम काका अभिनेते म्हणून ग्रेट होतेच.. त्यांचे पॉझेस.. त्यांचा मुद्राभिनय.. डोळ्यातून बोलण्याची त्यांची कमाल क्षमता.. भूमिका जगण्यातली मातब्बरी याविषयी सगळेच बोलत आहेत.. बोलत राहतील. पण त्यांच्याकडून इतर ही अनेक गोष्टी शिकण्यासारख्या होत्या.. व्यावसायिकता.. प्रत्येक कामात झोकून देण्याची वृत्ती.. अचूकता यावी म्हणून घेतलेले परिश्रम.. शरीर थकलं तरी विलक्षण सकारात्मक राहून काम करण्याचा स्वभाव.. स्वतःच्या काम आणि कुवतीविषयी सुयोग्य अभिमान.. हे सगळंच आम्हाला मार्गदर्शक ठरणारं .. त्यांची एक आठवण तर मी कधीच विसरणार नाही. एकदा या सुखांनो या च्या सेटवर एका मातब्बर हिंदी वाहिनीचे प्रतिनिधी त्यांची मुलाखत घ्यायला आले. खरं तर मुलाखत आदल्या दिवशी होणार होती.. पण वाहिनीच्या लोकांनी ती रद्द केली आणि विनंती करून आमच्या मालिकेच्या सेटवर आले.. काका सीन करण्यात व्यग्र होते.. आजची त्यांची पाहिली कमिटमेंट मालिकेशी होती.. म्हणून ते त्याला प्रायोरिटी देत होते.. वाहिनीच्या एक प्रतिनिधीने निरोप पाठवला.. 'तुम्ही तातडीने वेळ दिला नाही तर आम्ही निघून जाऊ' विक्रम काकांनी उलट निरोप दिला.. काल तुम्हाला वेळ दिला होता तेव्हा तुम्ही आला नाहीत.. आजची वेळ तुम्हाला तडजोड करून दिली आहे.. वाट बघावी लागेल.. शक्य नसेल तर खुशाल जा... If you don't interview Vikram Gokhale, it's not Vikram Gokhale's loss but yours .. स्वतःला इतकं मोठं बनवा की हा असा ॲटिट्यूड ठेवता यायला हवा.. हा धडाच मला त्या दिवशी काकांकडून मिळाला..

गेल्या पंधरा वर्षात मी विक्रम काकांबरोबर खूप काम केलं..

दोन वर्षांपूर्वी मी लिहिलेल्या एका मराठी चित्रपटात त्यांनी प्रमुख भूमिका केली. या चित्रपटाचं शूटिंग पूर्ण झालं. पण डबिंग मात्र राहूनच गेलं.. ते आता कधीच तितक्या ताकदीने पूर्ण होणार नाही.. कारण विक्रम काकांची रिप्लेसमेंट होऊ शकत नाही.. विक्रम काका.. तुमचं म्हणणं आज अगदी तंतोतंत पटतंय.. तुम्ही निघून गेलात आणि आमचं कधीही भरून न येणारं नुकसान झालंय..

सोबत जोडलेला फोटो.. या सुखांनो या मालिकेतला आहे..

विक्रमकाका या रूपात मला भेटले.. याच रूपात भावले आणि याच रूपात कायम स्मरणात राहतील.. ■ ■

हिंगाची गोष्ट

हिंग भारतात पिकत नाही? मग तो येतो तरी कुठून? रोजच्या जेवणात वापरतो त्याला अस्सल हिंग का म्हणता येणार नाही?

आश्चर्य वाटेल, पण आपण रोजच्या स्वयंपाकात वापरतो त्या हिंग अगदी एक ग्रॅमही भारतात पिकत नाही. आपली कुठलीच फोडणी हिंगाशिवाय पूर्ण होत नाही, पण.. हिंग काही भारतात पिकत नाही. हजारो वर्षे आपण बाहेरच्या देशांतून म्हणजे अफगाणिस्तान, इराण, उझबेकीस्तान अशा दूरवरच्या देशांतून हिंग मागवतो. जगात पिकणाऱ्या एकूण हिंगापैकी ४% हिंग आपणच वापरतो. दरवर्षी एकूण १२०० टन हिंग आयात करण्यासाठी आपण १३० कोटी डॉलरचा खर्च करतो.

या हिंगाची एक गंमत अशी आहे की भारतासारखे मोजकेच देश हिंगाचा वापर पाककृतीत करतात. युरोपियन अणि अमेरिकन लोकांना तर हिंगाचा वाससुद्धा नकोनकोसा वाटतो. त्यामुळे हिंग त्यांच्याकडे 'डेव्हिल्स डंग' या नावाने ओळखला जातो. भारतात ईशान्य-पूर्व राज्यांत पण हिंग जवळजवळ वापरला जात नाही. असं म्हणतात की १६ व्या शतकात मोगलांनी पहिल्यांदा हिंग आपल्याकडे आणून स्वयंपाकात रुजवला. पण या दाव्यात काही तथ्य असावे असे वाटत नाही. कारण आयुर्वेदात हिंग औषध म्हणून वापरला जातो. सध्या आपल्याला बाजारात जो हिंग मिळतो ती पावडर म्हणजे खरा हिंग नव्हे. ती पावडर म्हणजे गव्हाच्या पिठात ७०:३० प्रमाणात मिसळलेला हिंग. तर असा हा आपल्या अन्नातला महत्वाचा घटक भारतात पिकतच नाही. पण आता एक चांगली बातमी अशी आहे की भारतात हिंगाची रोपे तयार करून त्याची योग्य पद्धतीने वाढ करण्याचे तंत्र भारतीय कृषीतज्ञांनी विकसित केले आहे.

हिंग हा वनस्पतीच्या खोडातून पाझरणारा एक प्रकारचा डिंक आहे. त्यात गंधकाचे प्रमाण असल्याने तो खास गंध त्या डिंकाला मिळतो. सुकल्यावर हा डिंक गर्द तपकिरी रंगाचा होतो. हा डिंक असल्याने त्याची पावडर करणे कठीण असते. त्याला खलबत्यात घालुन तासनतास कुटावे लागते. त्यानंतर मैदा आणि इतर साधा नैसर्गिक डिंक घालून कुटल्यावर आपण वापरतो तशी हिंगाची पावडर तयार होते.

पण मुळात प्रश्न असा आहे की हिंग आपल्याकडे

का पिकत नाही? महत्वाचे कारण असे की हिंगाची लागवड कशी करावी यावर शास्त्रशुध्द मार्गदर्शन कुठेच उपलब्ध नाही. म्हणून आपल्या शास्त्रज्ञांना या वनस्पतीची ॲग्रोटेक्नॉलॉजी विकसित करावी लागली.

२०१६ पासून (CSIR) सेंटर फॉर सायंटिफिक अँड इंडस्ट्रीअल रिसर्चची एक शाखा इन्स्टिट्यूट ऑफ हिमालयन बायो रिसोर्स टेक्नॉलॉजी हिंग वनस्पतीची रोपे तयार करण्याचा प्रयत्न करत होती. भारतात हिंगाची रोपे उपलब्ध असल्याचा अनेकांचा दावा आहे, पण ती रोपे म्हणजे खरा हिंग ॲसाफोटीडा फेरुला नाहीत. हिंगाचे बीज गेल्या ३० वर्षांत भारतात कोणीही आणले नाही. दुसरे असे की इराण-अफगाणिस्तान हे देश युध्दात इतके गुंतलेले आहेत की त्यांच्याकडून काही मदत मिळण्याची अपेक्षाच नाही. हिंगाची रोपे उगवली की काही दिवसातच ती जमिनीत गडप होतात आणि नंतर बऱ्याच कालांतराने वर येतात. दुसरे असे की या रोपांची वाढ फक्त बर्फामुळे हवेतून जे बाष्प मिळते त्यावरच होते. इतर पिकांसारखे पाणी देता येत नाही. रासायनिक खतांचा वापर करता येत नाही. थोडक्यात हिमालयाच्या परिसरातच हिंगाचे पिक घेणे शक्य आहे. हिमालयन बायो रिसोर्स टेक्नॉलॉजीने एकूण ५०० हेक्टर जमिनीवर हिंगाची शेती केली आहे. सोबत त्या भागातील शेतकऱ्यांना प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. सोबतच 'टिश्यू कल्चर' सारखे तंत्र वापरून मोठ्या प्रमाणात या वनस्पतीची रोपे उपलब्ध होतील याची तयारीही चालू आहे. हे सर्व यशस्वी होण्यासाठी चार-पाच वर्षांचा कालावधी जाईल, पण त्यानंतर अफगाणिस्तानच्या दर्जाचा हिंग भारतात उपलब्ध होईल अशी खात्री शास्त्रज्ञांना आहे. सध्या बाजारात १०० ग्रॅम हिंगाचा भाव रुपये ३०० ते १००० इतका आहे. हे लक्षात घेता एक नवे 'कॅश क्रॉप' म्हणजेच नगदी पीक शेतकऱ्यांना मिळून थोड्याच वर्षांत जगभरात भारतीय हिंगाचा घमघमाट पसरला असेल! ■ ■

प्रशांत दामले - एक अवखळ उर्जा

अभिनेते प्रशांत दामले यांना नुकताच मानाचा असा संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यापूर्वी त्यांच्या नाटकांचा १२५०० वा प्रयोगही सादर झाला. त्यानिमित्ताने त्याचे हे कौतुक...

अमृता जोशी

प्रशांत दामले हे एक अजब रसायन आहे. कुठेही नुसते त्यांचे नाव आले तरीही त्यांचा काहीसा अवखळ, मिश्किल आणि गोबरा गुलाबी चेहरा डोळ्यांसमोर येतो. डोळ्यांत नेहमी कोणाचीतरी कोपरखळी काढताना असते तशी चमक असते. त्यांची आजवरची सर्व नाटके, चित्रपट, पाककृती कार्यक्रम या सगळ्यांतून आपल्याला एका अगदी मनमोकळ्या स्वभावाच्या माणसाचे दर्शन झाले आहे. या माणसाचे वैशिष्ट्य म्हणजे अभिनय, संगीत आणि हो, खाण्यावर देखील असलेले त्यांचे प्रेम आपल्यापासून कधीच लपून राहत नाही. आपल्या खुसखुशीत शैलीत संवाद साधत समोरच्यालाही बोलतं करत हा ससा (संदर्भ : सवत माझी लाडकी) अलगद समोरच्याच्या मनात स्थान मिळवतो.

खरंतर प्रशांत दामलेचा अभिनय काय, विनोदी जागा काढणे काय, देहबोली काय, ऊर्जा, उत्साह. अमाप उत्साह काय, याआधी आपण हे सर्व भरभरून अनुभवले आहेच. नव्याने काय लिहू? त्याची एक खास शैली आहे. तो प्रत्येक नाटकात तसाच बोलतो, तसाच हसतो, तसेच केस उडवत मान झटकतो तरीही प्रत्येकवेळी त्या त्या भूमिकेला समरस होऊन इतके प्रसन्न वातावरण कसे उभे करू शकतो ते त्याचे त्यालाच माहीत. काहीवेळा हसवत हसवत शेवटाला येताना गंभीर अभिनय करणारे प्रशांत दामले आपण एक परिपूर्ण नट असल्याचे अधोरेखित करतात. एकहाती प्रयोग खेचण्याची क्षमता असणारा हा हरहुन्नरी नट अजूनही दरवेळी त्याच्या प्रवेशाला टाळ्या मिळवतो.

नुकतेच आपल्या कारकिर्दीत नाटकांचे १२५०० प्रयोग पूर्ण करून प्रशांत दामले यांनी एक नवीन विक्रम रचला आहे. त्यांच्या कुठल्याही प्रयोगाला जाऊन बघा, तितकाच ताजेपणा प्रत्येक प्रयोगात जाणवतो आणि तोच प्रेक्षकांना भावतो. एकाच दिवसात ५ प्रयोग वेगवेगळ्या ठिकाणी हेही त्यांनी काहीवेळा करून दाखवलं आहे. मला वाटतं हे जास्त अवघड आहे. नाटक म्हणजे काय हे समजायला लागल्यापासून त्यांची बहुतेक सगळी नाटके मी पाहिली आहेत आणि कधीही निराश झाल्याचे आठवत नाही. प्रत्येक नाटकाची कथा, मांडणी, दिग्दर्शन तितकेच दमदार होते असे नाहीच, पण प्रशांत दामले हा secret ingredient प्रत्येक प्रयोगाची लज्जत वाढवायला उपयोगी येतो म्हणजे येतोच. सबकुछ दामले आहे असे लख्ख जाणवत असूनही काही नाटके तर त्यांनी याच भरवशावर यशस्वी करून दाखवली आहेत आणि ती प्रेक्षकांच्या पसंतीला देखील उतरली आहेत.

त्यांच्या या यशाचे रहस्य काय? ३९ वर्षे अविरत नाटके करत राहणे, आत्ताच्या सिनेमा आणि मालिकेच्या यशामागे धावणाऱ्या नटांच्या काळात कसे काय जमले असेल? इतर माध्यमांतून मिळणाऱ्या प्रसिद्धी आणि पैशाला ठामपणे 'नाही' म्हणून हा नाटकप्रेमी कसा तग धरून राहिला असेल? नुसता तग धरून नाहीच, उलट त्यातही स्वतःचं नाणं खणखणीत वाजवून तशीच प्रसिद्धी, पैसा आणि त्याहूनही आवडीच्या कामाचा आनंद या माणसाने मिळवला आणि रसिकांनाही वाटला. त्यांच्या या यशात वेळोवेळी त्यांना साथ देणारे सहकलाकार देखील महत्त्वाचे आहेत. त्यांच्यामुळेच हे शक्य झाल्याचे दामले सांगतात. तसेच त्यांच्याबरोबर निरनिराळ्या नाटकांच्या वेळी घडलेल्या गमतीजमती देखील मजेशीर असतात.

चित्रपटापेक्षा प्रयोगाची खासियत हीच की दरवेळी नाटक करायला मिळणे, त्याद्वारे लोकांशी दरवेळी कनेक्ट होणे, सहकलाकारांबरोबर भन्नाट किस्से अनुभवणे आणि काम करतानाच आयुष्यभरासाठी आठवणी देखील जमा करणे. अशा या अमूल्य आठवणींचा बटवा घेऊन 'स्मृतिगंध' आले आहेत '१३ प्रशांत दामले' या YouTube वरील कार्यक्रमात. प्रशांत दामलेंच्या विविध सहकलाकारांनी सांगितलेल्या त्यांच्या आठवणी, त्यांच्या यशाचे गमक, त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू ऐकताना या माणसासमोर, त्याच्या शिस्त आणि जिद्दीसमोर नतमस्तक व्हायला होते. त्याचबरोबर खूप हसवत हे भाग मनोरंजक देखील झाले आहेत. पुरुषोत्तम बेर्डे, विजय केंकरे, अशोक पत्की अशा ज्येष्ठ रंगकर्मींपासून कविता लाड, शुभांगी गोखले, विनय येडेकर, सुकन्या मोने, उमेश कामतपर्यंत सर्वांनी दिलखुलासपणे त्यांचा हा प्रवास उलगडला आहे. संकर्षण कऱ्हाडेचे निवेदन, प्रशांत दामले यांची प्रसन्न उपस्थिती आणि आलेल्या कलाकारांशी मनमोकळा संवाद असे या मुलाखतींच्या कार्यक्रमाचे साधेसोपे आणि त्यांच्याबरोबर आपल्यालाही nostalgia देणारे स्वरूप खूपच आवडले. यांतील संदीप पाठक बरोबर झालेल्या भागात दिवंगत अभिनेते सतीश तारे यांचेही किस्से ऐकायला मजा आली. मनमुराद हसवणारा भाग होता हा. त्याची लिंक देते आहे. इतरही भाग जरूर पहा आणि प्रशांत दामले हे प्रत्यक्षात काय रसायन आहे हे जाणून घेऊन थक्क व्हा! ■ ■

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ MH/MR/RGD/RNP-16/2018-20 (31-12-2022)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर** ■ **मुख्य संपादक : राजेंद्र नरहर साठे*** ■ **डिजिटल आवृत्ती संपादक : माधवी माणिक सावंत**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)